


# गोदातीर समाचार


RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६५ वे * अंक १५६ * नांदेड * शुक्रवार, दि. १२ जून २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211


## भारतीय कर्मचारी असलेल्या तिसऱ्या जहाजावर अमेरिकन नौदलाचा हल्ला, आतापर्यंत ३ जणांचा मृत्यू

**तेहरान (वृत्तसंस्था)–** भारतीय कर्मचारी असलेल्या तिसऱ्या जहाजावर अमेरिकन नौदलाचा हल्ला केला असून या हल्ल्यात ३ जणांचा मृत्यू झाला आहे. या घटनेवरून अमेरिकेच्या राजदूतांना भारतानं फटकारलं आहे.

ओमानजवळ भारतीय खलाशी असलेल्या जहाजांवर अमेरिकेने केलेल्या हल्ल्यांविरोधात भारताने तीव्र निषेध नोंदवला आहे. परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले की, अमेरिकेच्या नौदलाने भारतीय कर्मचारी असलेल्या एमटी जलवीर या तिसऱ्या जहाजावरही हल्ला केला. जहाजावरील सर्व २० भारतीय सुरक्षित असून, त्यांना वाचवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. यापूर्वी, एमटी सेट्टेबेलो आणि एमटी मेरीवेक्स या जहाजांवरही हल्ला झाला होता, ज्यात आतापर्यंत तीन भारतीय खलाशांचा मृत्यू झाला आहे.

परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले की, या तिन्ही जहाजांवर अमेरिकेच्या नौदलाने हल्ला केला होता. भारताने अमेरिकेच्या राजदूतांना बोलावून जहाजांवरील हल्ले तत्काळ थांबवण्याची मागणी करत तीव्र निषेध नोंदवला. अमेरिकेच्या सेंट्रल कमांडनेही या तीन जहाजांवरील हल्ल्यांची दखल घेतली आहे. सरकारने सांगितले की, सध्या आखाती प्रदेशात १३ भारतीय ध्वज असलेली जहाजे आणि १८,००० हून अधिक भारतीय खलाशी आहेत, त्यापैकी ५६२ भारतीय जहाजांवर तैनात आहेत.

ओमानच्या किनाऱ्याजवळ 'सेट्टेबेलो' या तेलवाहू जहाजावर झालेल्या हल्ल्याप्रकरणी भारताने अमेरिकेविरोधात तीव्र निषेध नोंदवला आहे. भारतीय सरकारने आपली चिंता व्यक्त करण्यासाठी आणि भारतीय खलाशांची सुरक्षा सर्वोच्च प्राधान्याची बाब असल्याचे सांगण्यासाठी, अमेरिकी दूतावासाचे प्रभारी जेसन मीक्स यांना परराष्ट्र मंत्रालयात बोलावले. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी सांगितले की, या हल्ल्यानंतर भारताने अमेरिकेकडे औपचारिक निषेध नोंदवला आहे. त्यांनी सांगितले की, मोठ्या संख्येने भारतीय खलाशी जगभरात, विशेषतः पर्शियन आखात आणि पश्चिम आशियामध्ये काम करतात. त्यामुळे, त्यांची सुरक्षा भारतासाठी अत्यंत महत्त्वाची आहे.

### 'आम्ही खर्ग बेटाचा ताबा घेऊ', ट्रम्प यांची इराणला धमकी

होर्मुझ सामुद्रधुनीतून जाणारी सागरी वाहतूक रोखण्याचा अधिकार अजूनही आपल्याकडे असल्याचा दावा इराणने केला होता. या सर्व घडामोडीनंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर करत इराणला मोठा इशारा दिला आहे. अमेरिका इराणवर सर्वात मोठा हल्ला करणार असल्याचे संकेत डोनाल्ड ट्रम्प यांची दिले आहेत. एवढंच नाही तर इराणच्या खर्ग बेटाचा ताबा घेण्याची धमकी देखील डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली आहे. त्यामुळे जगात पुन्हा एकदा मोठी खळबळ उडाली आहे.

## मान्सूनची गाडी अडकली! राज्यात उकाड्याचा कहर कायम

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्रात दाखल झालेल्या नैऋत्य मोसमी वाऱ्यांची (मान्सून) वाटचाल सध्या मंदावली असून राज्यातील नागरिकांना आणखी काही दिवस उकाड्याचा सामना करावा लागणार आहे. भारतीय हवामान विभागाच्या माहितीनुसार, मान्सूनची उत्तर सीमा गेल्या दोन दिवसांपासून कोकणातील हर्णे आणि मध्य महाराष्ट्रातील सोलापूर परिसरातच स्थिरावली आहे. वातावरणातील आर्द्रतेचा अभाव आणि वाऱ्यांचा वेग कमी झाल्याने मान्सूनच्या प्रगतीला ब्रेक लागला आहे. मात्र, पुढील तीन ते चार दिवसांत हवामानात अनुकूल बदल होण्याची शक्यता असून त्यानंतर मान्सून पुन्हा वेग पकडू शकतो.

सध्या अनेक भागांत आकाश ढगाळ दिसत असले तरी पावसासाठी आवश्यक असलेली ढगांची घनता निर्माण होत नसल्याचे हवामान विभागाने स्पष्ट केले आहे. प्रतिचक्रवाताचा प्रभाव कमी झाल्यानंतरच मान्सून मुंबई, पुणे आणि राज्यातील इतर भागांकडे वेगाने सरकेल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

## आतापर्यंत सगळं समजून घेतलं, यापुढे कुणाचाही अनावश्यक हस्तक्षेप चालणार नाही

### सुनेत्रा पवारांचा नेत्यांना इशारा



**मुंबई (प्रतिनिधी)–** राष्ट्रवादी काँग्रेसच्या २७ व्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांनी नेत्यांना गंभीर इशारा दिला आहे. आतापर्यंत जे काही घडलं ते समजून घेतलं, यापुढे कुणाचाही अनावश्यक हस्तक्षेप होत असेल तर त्याचा नक्कीच विचार केला जाईल, अशा शब्दात सुनेत्रा पवारांनी इशारा दिला. प्रत्येक कार्यकर्त्याची निष्ठा, काम आणि समर्पण माझ्या लक्षात आहे. योग्य वेळी त्याला न्याय आणि संधी मिळणार याची खात्री देते, असं आश्वासनही सुनेत्रा पवारांनी दिलं.

राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांनी पक्षाच्या भविष्यातील वाटचालीची दिशा स्पष्ट केली. पक्षहिताला सर्वोच्च प्राधान्य देत अजितदादा ज्या प्रमाणे कठोर निर्णय घ्यायचे त्याप्रमाणे निर्णय घेतले जातील असं त्या म्हणाल्या.

सुनेत्रा पवार म्हणाल्या की, पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची धुरा खांद्यावर घेताना मला सगळ्याची जाणीव होती. मी पक्षाला सर्वोच्च प्राधान्य दिलं. आतापर्यंत पक्षामध्ये जे घडलं, प्रत्येकवेळी मी सर्वांना समजून घेतलं, सावरून घेतलं. दादांनी त्यांच्या हयातीत कार्यकर्त्यांना समजून घेतलं, त्यांचा हट्ट पुरवला. त्यांना मान सन्मान दिला, पदं दिली. जे काही मागितलं ते देण्याचा प्रयत्न केला. यापुढे पक्षहिताला सर्वोच्च प्राधान्य दिलं जाईल, कुणाचाही अनावश्यक हस्तक्षेप होत असेल तर नक्कीच विचार केला जाईल.

दादा ज्या प्रमाणे पक्षहितासाठी कठोर निर्णय घेत, तसेच निर्णय घेतले जातील. ते माझ्या स्वभावाला जड जाईल, पण दादांच्या पावलावर पाऊल ठेवण्यासाठी प्रयत्न केला जाईल. मला खात्री आहे, पक्षाचे कार्यकर्ते, पदाधिकारी हे पक्षहिताच्या निर्णयामध्ये माझी साथ देतील, असं सुनेत्रा पवार म्हणाल्या. पक्षाची होणारी बदनामी माझ्यासह आपल्या सर्वांचीच आहे. मला या संदर्भामध्ये कठोर भूमिका घेण्याची वेळ येणार नाही याची सर्वांनीच खबरदारी घ्यावी, असंही त्या म्हणाल्या.

सुनेत्रा पवार म्हणाल्या की, प्रत्येक कार्यकर्त्याची निष्ठा, काम आणि समर्पण माझ्या लक्षात आहे. योग्य वेळी त्याला न्याय आणि संधी मिळणार याची खात्री देते. लवकरच विविध महामंडळांच्या नियुक्त्या केल्या जातील. पक्ष निष्ठा आणि समर्पण या निकषावर हे निर्णय घेतले जातील. पक्षासाठी किती वर्षे काम केलं यापेक्षा पक्षाला किती पुढे नेलं जाईल याचा विचार केला जाईल. बाहेरून आलेल्या नेत्यांचा सन्मान राखण्यासाठी काही तडजोडी केल्या जातील, पण कार्यकर्त्यावर अन्याय होऊ देणार नाही.

## 'राष्ट्रवादी'ही काँग्रेस पक्षात विलीन होणार असल्याची चर्चा

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसमध्ये उभी फूट पडल्याच्या पार्श्वभूमीवर देशाचे राजकारण १८० अंशात फिरण्याची शक्यता आहे. देशभरातली प्रमुख विरोधक काँग्रेसच्या छताखाली एकत्र येण्याच्या प्रयत्नात असून तृणमूलपाठोपाठ शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसनेही पक्ष विलिनीकरणाची थेट ऑफर काँग्रेसला दिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होत आहे.

पुढच्या काही दिवसांत राष्ट्रवादी काँग्रेसकडून त्यादृष्टीने पावले पडतील, असेही सूत्रांनी सांगितले.

शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने गेल्या वर्ष दीड वर्षात कायमच अजित पवार यांच्या राष्ट्रवादीशी जुळवून घेण्याचा प्रयत्न केला. अजित पवार यांनीही त्यांच्या अखेरच्या काळात विलिनीकरणाच्या दृष्टीने पावले टाकली. परंतु अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर त्यांच्या पक्षातील वरिष्ठ नेत्यांनी विलिनीकरणास विरोध केल्याने दोन्ही राष्ट्रवादीचे मनोमीलन होऊ शकले नाही. त्यामुळे शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे पुढील भवितव्य काय? असा प्रश्न उपस्थित होतो. याच कारणास्तव काँग्रेसमध्ये विलिनीकरणाचा पर्याय राष्ट्रवादीच्या प्रमुख नेत्यांना वाटतो, असे सूत्रांनी सांगितले.

## किरकोळ वादातून तरुणाचा कटरने वार करून खून

### विमानतळ ठाण्याच्या हद्दीतील घटना




**नांदेड (प्रतिनिधी)–** किरकोळ कारणावरून झालेल्या वादाचा वचपा काढण्यासाठी एका २० वर्षीय तरुणावर कटरने वार करून त्याचा खून केल्याची थरारक घटना सैलानी नगर भागातील रेणुका टेन्ट हाऊसच्या पायऱ्यांवर घडली. गौतम कुंडलीक गजभारे (वय २०, रा. पंचशील चौक, गोविंद नगर) असे मृत तरुणाचे नाव आहे.

याप्रकरणी पोलिसांनी तत्परता दाखवत संशयित आरोपी सत्यम शंकर जाधव (वय ५८, रा. पंचशील चौक, गोविंद नगर) याला त्याच्या राहत्या घरातूनच ताब्यात घेतले आहे. मिळालेल्या माहितीनुसार गौतम गजभारे आणि संशयित आरोपी सत्यम जाधव हे दोघेही गोविंदनगरमधील पंचशील चौक परिसरात समोरासमोर राहतात. त्यांच्यामध्ये गेल्या काही दिवसांपासून किरकोळ कारणांवरून सतत खटके उडून वाद होत होते. याच वादाचा राग मनात धरून आरोपी सत्यम जाधव याने गौतमचा काटा काढण्याचे ठरवले.

मंगळवारी रात्री पावणे दहाच्या सुमारास गौतम गजभारे हा सैलानीनगर येथील रेणुका टेन्ट हाऊसच्या पायऱ्यांवर बसलेला होता. दरम्यान, आरोपी सत्यम जाधव हा आपल्या स्कूटीवरून अचानक त्या ठिकाणी आला. काही समजण्याच्या आतच त्याने आपल्या जवळील कटरने गौतमच्या पायावर खोलवर गंभीर वार केले. वार केल्यानंतर आरोपी सत्यम जाधव घटनास्थळावरून स्कूटीवर बसून सुसाट **(पान ६ वर...)**

## प्रसिद्ध कॉमेडियन प्रणित मोरेवर गुन्हा दाखल

**मुंबई (प्रतिनिधी)–** 'बिग बॉस' फेम आणि प्रसिद्ध स्टँड-अप कॉमेडियन प्रणित मोरेच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. सोशल मीडियावर तुफान व्हायरल झालेल्या ३७० रुपयांच्या बिर्याणी वादाप्रकरणी महाराष्ट्र सायबर पोलिसांनी प्रणित मोरेसह इतरांवर गुन्हा दाखल केला आहे. एका शो दरम्यान महिलांबद्दल अत्यंत आक्षेपार्ह आणि अश्लील वक्तव्य केल्याचा ठपका त्याच्यावर ठेवण्यात आला आहे. महाराष्ट्र सायबर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रणित मोरेच्या एका शोमधील काही व्हिडिओ क्लिप्स यूट्यूब, इंस्टाग्राम आणि इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर जोरदार व्हायरल झाल्या होत्या.




## कॉक्रोच पार्टीचा पुण्यात इशारा; अन्यथा २० जूनला दिल्लीत पुन्हा आंदोलन

**पुणे (प्रतिनिधी)–** तरुणाईचा देश असलेल्या भारत देशात आज शिक्षण आणि रोजगाराचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यातच पेपरफुटीच्या प्रकरणातून लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा खेळ केला आहे, तरीही मंत्री महोदयांना खुर्ची सुटत नाही. देशातील एक कोटी विद्यार्थ्यांचे भविष्य महत्त्वाचे की एका मंत्र्याचे पद? असा प्रश्न करत कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी केंद्र सरकारला अल्टीमेटम दिला आहे. येत्या शनिवारपर्यंत धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेतला नाही, तर २० जून रोजी दिल्लीत देशव्यापी आंदोलन करू, असा इशारा देखील दिला.

परीक्षा व्यवस्थेतील गैरव्यवस्था, पेपरफुटी, निकालातील विलंब आणि भरती प्रक्रियेतील अडचणी याविरोधात विद्यार्थ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. 'केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्या' अशी मागणी करत परिसर दणाणून सोडला.

प्रश्न शिक्षण अन् पर्यावरणाचा, मार्ग सत्य आणि अहिंसेचा : देशातील तमाम तरुणाईच्या आणि मानवी अस्तित्वाच्या विषयाला अजेंड्यावर आणले पाहिजे. यात शिक्षण आणि पर्यावरण हा मुद्दा प्रमुख बनला पाहिजे.

हिंदु-मुस्लिम राजकारण सोडा, प्रश्नांवर बोला! देशातील राजकारण हिंदू-मुस्लीम मुद्द्यावरच फिरवले जात आहे. त्या पलीकडे जाऊन रोजगार, शिक्षण, महागाई आणि पायाभूत सुविधांच्या प्रश्नांवर चर्चा होणे आवश्यक आहे, असेही दीपके यांनी आवाहन केले. सरकारने आंदोलनकर्त्यांना 'अराजक तत्त्वे' संबोधल्याच्या वक्तव्यावर तीव्र नाराजी व्यक्त करत 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार मानणारे आणि संविधानाच्या बाजूने उभे राहणारे लोक अराजकवादी कसे असू शकतात? असा प्रश्न दीपके यांनी उपस्थित केला.

## वर्षाला ७०० ब्रासपर्यंत वाळू अन् माती मिळणार मोफत

### कुंभार समाजासाठी सरकारचा निर्णय!

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील कुंभार समाजाच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी आणि पारंपरिक व्यवसायाला चालना देण्यासाठी राज्य सरकारने एक मोठा घेतला आहे. कुंभार समाज, मूर्तीकार आणि विटा बनविणाऱ्या कारागिरांना आता वर्षाला तब्बल ७०० ब्रासपर्यंत उपयुक्त माती आणि वाळू मोफत देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे.

विटा, कौले, मडकी व इतर मातीच्या वस्तू तयार करण्यासाठी लागणाऱ्या वाळूवर आता कोणतीही रॉयल्टी आकारली जाणार नाही. आवश्यक परवानगी घेतल्यानंतर कारागिरांना स्वखर्चाने समुद्राच्या तळातून, नदी, नाले आणि खाडी पात्रातून ही वाळू वाहून नेण्याची मुभा असेल, असे सरकारने स्पष्ट केले आहे.

कुंभार समाजाची ही मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत समाजाला आश्वासन दिले होते. त्यानुसार मध्य प्रदेशमधील धोरणाच्या धर्तीवर महाराष्ट्रातही ही नवीन योजना लागू करण्यात आली आहे.

## इथेनॉल-मिश्रित पेट्रोलवरील एक्साईज ड्युटी पूर्ण माफ

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** पश्चिम आशियातील वाढता संघर्ष, जागतिक ऊर्जा बाजारातील अस्थिरता आणि कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. इथेनॉल-मिश्रित पेट्रोलवरील उत्पादन शुल्क (एक्साईज ड्युटी) पूर्णपणे माफ करण्याची घोषणा केंद्र सरकारने अधिकृत अधिसूचनेद्वारे केली आहे. या निर्णयामुळे भारताच्या ऊर्जा आत्मनिर्भरतेला चालना मिळण्याबरोबरच परदेशी तेलावरील अवलंबित्व कमी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

सरकारने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, २२ ते ३० टक्के इथेनॉल मिश्रित पेट्रोलवरील एक्साईज ड्युटी रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे ई-२२, ई-२५, ई-२७ आणि ई-३० या श्रेणीतील पेट्रोलवर तेल कंपन्यांना कोणतेही उत्पादन शुल्क भरावे लागणार नाही. जागतिक स्तरावर कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये मोठी चढ-उतार सुरू आहेत.



जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. दैविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# शिक्षकांचा अभाव : शिक्षण व्यवस्थेचे मोठे संकट

आता जनगणनेचं खरं तर घरगणनेचं बळजबरी लादण्यात आलेलं शिक्षकांचं काम संपलं आहे आणि त्यांना आता त्यांच्या अध्यापनाच्या मूळ कर्तव्याकडे वळायचे आहे. कारण सोमवार-पासून शाळा सुरू होत आहेत, पण शिक्षकांनी अध्यापन केलेच पाहिजे असा शासनाचा आग्रह नाही. अध्यापन सोडून त्यांनी शासनाची इतर सर्व कामे करावीत असाच अलिखित अध्यादेश आहे. त्यात पुन्हा शिक्षकांची कमतरता. हा प्रश्न प्राथमिक वर्गापासून ते विद्यापीठीय वर्गापर्यंत सारखाच ग्रासलेला आहे. आज देशात शिक्षणाचा विस्तार झपाट्याने होत असल्याचे चित्र आज सर्वत्र दिसते. यामध्ये विद्यार्थ्यांची वाढती संख्या ही देशाच्या प्रगतीची खूण असली, तरी शिक्षकांशिवाय ती प्रगती अपुरी ठरणार आहे. कारण शिक्षणव्यवस्थेचा खरा कणा इमारती नव्हेत, तर वर्गात उभा असलेला शिक्षक असतो. याचाच सोयीस्कर विसर शासनाला पडला आहे. नवीन विद्यापीठे, अभियांत्रिकी व व्यावसायिक महाविद्यालये, नवनवीन खाजगी शाळा, कौशल्याधारित अभ्यासक्रम आणि संशोधन केंद्रांची संख्या वाढत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थीही आता मोठ्या प्रमाणावर उच्च शिक्षणाकडे वळत आहेत. शिक्षणाबाबत जागरूकता वाढली, पालकांच्या अपेक्षा उंचावल्या आणि सरकारी योजनांमुळे लाखो युवक-युवती महाविद्यालयाच्या उंबरठ्यावर पोहोचले. ही परिस्थिती देशाच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी निश्चितच सकारात्मक आहे. मात्र या वाढत्या शिक्षणव्यवस्थेच्या पायाभूत रचनेत एक गंभीर पोकळी दिवसेंदिवस ठळक होत आहे, ती म्हणजे पात्र शिक्षकांची भीषण कमतरता. विद्यार्थ्यांची संख्या झपाट्याने वाढत असताना शिक्षक भरती मात्र त्याच वेगाने झालेली नाही. देशातील अनेक केंद्रीय व राज्य विद्यापीठांमध्ये हजारो प्राध्यापकांची पदे रिक्त आहेत. अनेक महाविद्यालयांमध्ये कायमस्वरूपी शिक्षकांची संख्या अत्यल्प असल्याने संपूर्ण विभाग तात्पुरत्या किंवा तासिका तत्त्वावरील शिक्षकांच्या आधारावर चालवले जात आहेत. या शिक्षकांना अल्प वेतन, असुरक्षित नोकरी आणि मर्यादित सुविधा मिळतात. परिणामी, शिक्षणाची गुणवत्ता टिकवून ठेवणे कठीण बनले आहे. आज अनेक वर्गखोल्यांमध्ये एका शिक्षकावर शेकडो विद्यार्थ्यांची जबाबदारी आहे. अध्यापनासोबत प्रशासकीय कामांचा बोजाही त्यांच्यावर टाकला जातो. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन, संशोधन सहाय्य किंवा शैक्षणिक संवाद मिळणे जवळपास अशक्य होते. शिक्षण केवळ परीक्षाकेंद्रित बनते; विचारशक्ती, संशोधनवृत्ती आणि नवोपक्रम यांना दुय्यम स्थान मिळते. विद्यापीठांची खरी ओळख भव्य इमारतींमध्ये नसून सक्षम शिक्षकांमध्ये असते, हे धोरणकर्त्यांनी लक्षात घेण्याची वेळ आली आहे. शिक्षक टंचाईमागे अनेक कारणे आहेत. सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे भरती प्रक्रियेमधील विलंब. अनेक राज्यांत प्राध्यापक व शिक्षक भरतीची प्रक्रिया वर्षानुवर्षे रखडलेली आहे. आर्थिक मर्यादा, प्रशासकीय गुंतागुंत, न्यायालयीन वाद, राजकीय अनास्था, कर्जग्रस्त शासन आणि धोरणात्मक अनिश्चितता यामुळे नवीन भरती होत नाही. दुसरीकडे दरवर्षी अनुभवी शिक्षक निवृत्त होत आहेत; मात्र त्यांच्या जागी नवीन शिक्षक नेमले जात नाहीत. त्यामुळे रिक्त पदांचा आकडा सातत्याने वाढत आहे. याहून चिंताजनक बाब म्हणजे तरुण पिढीचा अध्यापन व्यवसायाकडे असलेला कमी होत चाललेला कल. खासगी क्षेत्रात अधिक वेतन, वेगवान करिअर आणि आर्थिक सुरक्षितता मिळत असल्याने, आणि जातीवर आधारित आरक्षणाची कोणतीही भानगड नसल्याने अनेक गुणवंत विद्यार्थी या क्षेत्राकडे वळतात, परंतु ते संशोधन किंवा अध्यापन क्षेत्रात येण्यास उत्सुक नाहीत. शिक्षकी पेशाकडे आज अस्थिर आणि कमी मोबदल्याचा व्यवसाय म्हणून पाहिले जाते. 'शिक्षण सेवक' नावाची एक जमात तयार करून शिक्षकांना नैराश्याच्या खाईत ढकलण्यात आले आहे. अशा मानसिकतेमुळे शिक्षणातील गुणवत्ता आणखी खालावत आहे. दरम्यान, सरकार आणि शिक्षणसंस्था नवीन इमारती, डिजिटल सुविधा आणि अभ्यासक्रम विस्तारावर मोठ्या प्रमाणात खर्च करीत आहेत; मात्र मानवी संसाधनांच्या विकासाकडे तितकेसे लक्ष दिले जात नाही. शिक्षकांशिवाय शिक्षणसंस्था म्हणजे आत्म्याविना शरीर होय. अत्याधुनिक कॅम्पस उभारूनही जर वर्गात गुणवत्तापूर्ण शिक्षक नसेल, तर त्या विकासाला काही अर्थ उरत नाही. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये बहुविषयक शिक्षण, संशोधन, नवोपक्रम आणि जागतिक दर्जाचे विद्यापीठ निर्माण करण्याची महत्त्वाकांक्षी उद्दिष्टे मांडली आहेत. परंतु या उद्दिष्टांची पूर्तता सक्षम शिक्षकांशिवाय शक्य नाही. विद्यार्थ्यांना कौशल्याधारित शिक्षण, संशोधनाची प्रेरणा आणि जागतिक दर्जाचे मार्गदर्शन देण्यासाठी प्रशिक्षित व कायमस्वरूपी प्राध्यापकांची गरज आहे. शिक्षकांची कमतरता कायम राहिली, तर राष्ट्रीय शिक्षण धोरण केवळ कागदावरील घोषणांपुरते मर्यादित राहण्याचा धोका आहे. शिक्षण क्षेत्रातील ही समस्या केवळ रोजगाराची नाही; ती देशाच्या भविष्यासंबंधी आहे. भारताला ज्ञानाधारित अर्थव्यवस्था बनायचे असेल, संशोधन क्षेत्रात जागतिक नेतृत्व मिळवायचे असेल आणि कुशल मनुष्यबळ निर्माण करायचे असेल, तर शिक्षक भरतीला सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागेल. रिक्त पदे तातडीने भरणे, भरती प्रक्रिया पारदर्शक व वेळबद्ध करणे, शिक्षकांना सन्मानजनक वेतन व स्थैर्य देणे आणि संशोधनाला प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे.

# बालपणाला मुक्त श्वास देऊया!

दि. १२ जून हा दिवस जगभरात 'बालमजुरीविरोधी जागतिक दिन' म्हणून साजरा केला जातो. बालपण हे प्रत्येक मुलाच्या आयुष्यातील सर्वात निरागस, आनंददायी आणि घडणारा काळ असतो. या काळात मुलांच्या हातात पुस्तके, खेळणी आणि स्वप्नांची रंगीत दुनिया असायला हवी; परंतु वास्तव मात्र यापेक्षा खूप वेगळे आहे. जगातील कोट्यवधी मुले आजही गरिबी, सामाजिक विषमता, अशिक्षितपणा आणि विविध प्रतिकूल परिस्थितींमुळे शिक्षणापासून वंचित राहून मजुरी करण्यास भाग पडत आहेत. त्यांच्या कोवळ्या हातात पेनऐवजी विटा, कचऱ्याच्या पिशव्या, चहाचे ग्लास किंवा कारखान्यातील धोकादायक साधने दिली जात आहेत. ही परिस्थिती केवळ त्या मुलांच्या भविष्यावरच परिणाम करणारी नाही, तर संपूर्ण समाजाच्या विकासालाही अडथळा निर्माण करणारी आहे. म्हणूनच बालमजुरीविरोधी जागतिक दिनाचे महत्त्व अधिक अधोरेखित होते.



बालमजुरी ही केवळ आर्थिक समस्या नसून ती सामाजिक, नैतिक, शैक्षणिक आणि मानवी हक्कांशी संबंधित गंभीर समस्या आहे. जेव्हा एखाद्या मुलाला त्याच्या वयानुसार शिक्षण, खेळ, आरोग्य आणि सुरक्षित वातावरणापासून वंचित ठेवून उपजीविकेसाठी काम करण्यास भाग पाडले जाते, तेव्हा ती बालमजुरी ठरते. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या व्याख्येनुसार अशी कोणतीही कामे जी मुलांच्या शारीरिक, मानसिक, सामाजिक किंवा नैतिक विकासासाठी घातक ठरतात आणि त्यांच्या शिक्षणात अडथळा निर्माण करतात, ती बालमजुरी मानली जातात. बालमजुरीमुळे मुलांचे बालपण हिरावले जाते, त्यांचे शिक्षण अर्धवट राहते आणि त्यांचे आयुष्य गरिबीच्या दुष्टचक्रात अडकून पडते.

बालमजुरीचा इतिहास मानवजातीच्या औद्योगिक विकासाशी निगडित आहे. औद्योगिक क्रांतीच्या काळात कारखान्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर बालकामगारांचा वापर केला जात असे. कमी वेतनात, जास्त वेळ आणि कोणतीही सुरक्षा नसताना मुलांकडून काम करून घेतले जात असे. कालांतराने समाजसुधारक, मानवाधिकार संघटना आणि विविध देशांच्या सरकारांनी बालमजुरीविरोधात आवाज उठवला. कामाच्या ठिकाणी मुलांचे होणारे शोषण रोखण्यासाठी विविध कायदे करण्यात आले. या चळवळीचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे २००२ साली आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने १२ जून हा दिवस 'बालमजुरीविरोधी जागतिक दिन' म्हणून घोषित केला. या दिवसाचे उद्दिष्ट बालमजुरीविषयी जनजागृती करणे, बालकामगारांच्या समस्यांकडे जगाचे लक्ष वेधणे आणि बालमजुरी निर्मूलनासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्यास प्रोत्साहन देणे हे आहे.

बालमजुरीची कारणे अनेकांगी आहेत. गरिबी हे त्यामधील प्रमुख कारण मानले जाते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांमध्ये मुलांच्या कमाईला कुटुंबाच्या उत्पन्नाचा एक भाग म्हणून पाहिले जाते. शिक्षणाचा खर्च, बेरोजगारी, कर्जबाजारीपणा आणि अपुरी सामाजिक सुरक्षा यामुळे पालक मुलांना कामावर पाठवतात. अशिक्षित पालकांना शिक्षणाचे महत्त्व समजत नाही आणि तात्पुरत्या आर्थिक गरजांपुढे मुलांच्या भवितव्याकडे दुर्लक्ष होते. काही भागांत सामाजिक रूढी, लिंगभेद आणि पारंपरिक व्यवसायांची सक्ती यांमुळेही बालमजुरी वाढीस लागते. मुलींना घरगुती कामे किंवा घरकामासाठी इतरांकडे पाठविण्याच्या घटनाही मोठ्या प्रमाणात आढळून येतात.

शिक्षणाचा अभाव आणि बालमजुरी यांचे घनिष्ठ नाते आहे. जी मुले शाळेबाहेर राहतात, त्यांना बालमजुरीच्या विळख्यात अडकण्याची शक्यता अधिक असते. दुसरीकडे, जेव्हा मुले काम करू लागतात, तेव्हा त्यांचे शिक्षण खंडित होते. अशा प्रकारे गरिबी, अशिक्षण आणि बालमजुरी यांचे दुष्टचक्र तयार होते. या दुष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी सर्वसमावेशक आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण अत्यंत आवश्यक आहे. शाळांमध्ये आकर्षक वातावरण, मोफत शैक्षणिक सुविधा, पौष्टिक आहार योजना आणि पालकांमध्ये जागृती निर्माण केल्यास बालमजुरीचे प्रमाण कमी होऊ शकते.

भारतात बालमजुरी ही चिंतेची बाब राहिली आहे. देशाने आर्थिक प्रगती केली असली, तरी अनेक सामाजिक आणि आर्थिक विषमतांमुळे बालमजुरी पूर्णतः नष्ट झालेली नाही. ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागांमध्ये बालकामगार आढळून येतात. काही मुले शेतीत काम करतात, तर काही लहान उद्योग, हॉटेल्स, वर्कशॉप्स, विटभट्ट्या आणि घरगुती उद्योगांमध्ये गुंतलेली असतात. शहरांमध्ये स्थलांतरित कुटुंबांतील मुलांवर बालमजुरीचे संकट अधिक तीव्रतेने दिसून येते. कोविड-१९ महामारीनंतर अनेक कुटुंबांच्या आर्थिक स्थितीवर विपरीत परिणाम झाल्याने काही भागांत बालमजुरीचे प्रमाण वाढल्याची भीती व्यक्त करण्यात आली होती.

भारतीय राज्यघटनेने बालकांच्या संरक्षणासाठी विविध तरतुदी केल्या आहेत. राज्यघटनेच्या कलम २४ नुसार चौदा वर्षांखालील मुलांना कारखाने, खाणी किंवा इतर धोकादायक उद्योगांमध्ये कामावर ठेवण्यास बंदी घालण्यात आली आहे. कलम २१-अ नुसार सहा ते चौदा वर्षे वयोगटातील मुलांना मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार देण्यात आला आहे. राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांमधील कलम ३९ मध्ये मुलांच्या आरोग्याचे आणि विकासाचे संरक्षण करण्यावर भर देण्यात आला आहे. या घटनात्मक तरतुदी बालहक्कांच्या संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण ठरतात.

भारतात बालमजुरी प्रतिबंधासाठी विविध कायदे अस्तित्वात आहेत. बालमजुरी (प्रतिबंध आणि नियमन) अधिनियम १९८६ आणि त्यामधील २०१६ मधील सुधारणा महत्त्वपूर्ण आहेत. या कायद्यानुसार चौदा वर्षांखालील मुलांना कोणत्याही व्यवसायात रोजगार देण्यास बंदी घालण्यात आली आहे. तसेच चौदा ते अठरा वर्षे वयोगटातील किशोरांना धोकादायक उद्योगांमध्ये काम करण्यास मनाई करण्यात आली आहे. शिक्षणाचा हक्क कायदा, किशोर न्याय कायदा आणि मानवी तस्करीविरोधी तरतुदी देखील बालमजुरीविरोधातील लढ्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. तथापि, केवळ कायदे पुरेसे नसून त्यांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

बालमजुरी ही मुलांच्या मूलभूत मानवी हक्कांचे उल्लंघन आहे. प्रत्येक मुलाला शिक्षण, आरोग्य, सुरक्षितता, संरक्षण आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. बालहक्कांसंदर्भातील संयुक्त राष्ट्रसंघाच्या करारामध्ये मुलांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यात आला आहे. बालमजुरी या हक्कांना बाधा आणते आणि मुलांना त्यांच्या क्षमतांचा पूर्ण विकास करण्यापासून रोखते. त्यामुळे बालमजुरीविरोधातील लढा हा मानवी प्रतिष्ठेच्या संरक्षणासाठी आवश्यक आहे.

बालमजुरी निर्मूलनासाठी सरकार, स्वयंसेवी संस्था, उद्योगक्षेत्र, शैक्षणिक संस्था आणि सामान्य नागरिक यांचे संयुक्त प्रयत्न आवश्यक आहेत. सरकारने गरिबी निर्मूलनाच्या योजना प्रभावीपणे राबविणे, गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देणे आणि कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. स्वयंसेवी संस्था बालकामगारांची ओळख पटविणे, त्यांचे पुनर्वसन करणे आणि समाजामध्ये जागृती निर्माण करणे यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. उद्योगक्षेत्राने पुरवठा साखळीमध्ये बालकामगारांचा वापर होणार नाही याची खात्री करणे आवश्यक आहे.

शिक्षण हा बालमजुरीविरोधातील सर्वात प्रभावी उपाय मानला जातो. प्रत्येक मुलाला दर्जेदार, सर्वसमावेशक आणि आनंददायी शिक्षण मिळाल्यास बालमजुरीचे प्रमाण लक्षणीयरीत्या घटू शकते. शाळा सोडलेल्या मुलांना पुन्हा शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष उपक्रम राबविणे आवश्यक आहे. कौशल्य विकास, समुपदेशन आणि आर्थिक सहाय्याच्या माध्यमातून बालकामगारांचे पुनर्वसन केले जाऊ शकते.

आज विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात मानवाने अभूतपूर्व प्रगती केली आहे; परंतु जर समाजातील एकही मूल शिक्षणापासून वंचित राहून मजुरी करण्यास भाग पडत असेल, तर आपल्या विकासाच्या संकल्पना अपूर्ण ठरतात. मुलांच्या हातात कामाची साधने नव्हे तर ज्ञानाची साधने असली पाहिजेत. त्यांना भयमुक्त, शोषणमुक्त आणि आनंदी बालपण मिळणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.

बालमजुरी निर्मूलन हा केवळ सरकारचा कार्यक्रम नसून तो सामाजिक चळवळ बनला पाहिजे. प्रत्येकाने आपल्या स्तरावर जागरूक राहून बालमजुरीच्या घटनांची माहिती संबंधित यंत्रणांना द्यावी. बालकामगारांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी सहकार्य करावे. समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन बालपणाचे संरक्षण करण्यासाठी पुढाकार घेतल्यासच बालमजुरीमुक्त समाजाची निर्मिती शक्य होईल.

दि. १२ जूनचा हा दिवस आपल्याला एक महत्त्वपूर्ण संदेश देतो की मुलांचे स्थान शाळेत आहे, कामाच्या ठिकाणी नाही. त्यांच्या चेहऱ्यावरचे हसू, डोळ्यांतील स्वप्ने आणि भविष्याबद्दलची आशा जपणे हीच खरी मानवता आहे. प्रत्येक मूल हे राष्ट्राची अमूल्य संपत्ती आहे. त्यांना सुरक्षित, सन्मानपूर्वक आणि संधींनी समृद्ध जीवन देणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. बालमजुरीविरोधातील संघर्ष हा मुलांच्या अधिकारांसाठी, सामाजिक न्यायासाठी आणि अधिक संवेदनशील जगाच्या निर्मितीसाठीचा संघर्ष आहे. चला, या जागतिक दिनानिमित्त आपण सर्वजण अशी प्रतिज्ञा करूया की कोणत्याही मुलाचे बालपण मजुरीच्या ओझ्याखाली दबले जाणार नाही. प्रत्येक मुलाला शिक्षण, संरक्षण, प्रेम आणि स्वप्न पाहण्याचे स्वातंत्र्य मिळेल. कारण बालपण वाचविणे म्हणजेच भविष्य वाचविणे होय.

**-डॉ. राजेंद्र बगाटे**
हिंगोली
मो.९९६०१०३५८२

# प्रामाणिक अधिकाऱ्यांपेक्षा प्रामाणिक नागरिकांची गरज अधिक



समाजात भ्रष्टाचार, भेसळ, अतिक्रमण, नियमभंग आणि प्रशासनातील अनागोंदी याविषयी सर्वसामान्य नागरिकांकडून सातत्याने नाराजी व्यक्त केली जाते. प्रत्येकाला चांगली व्यवस्था हवी असते, प्रामाणिक अधिकारी हवेत, कायद्याचे राज्य हवे असते. परंतु जेव्हा एखादा अधिकारी खऱ्या अर्थाने नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी कठोर भूमिका घेतो, तेव्हा त्याच अधिकाऱ्याला विरोधाचा सामना करावा लागतो. ही आपल्या समाजातील सर्वात मोठी विसंगती आहे.

तुकाराम मुंढे यांसारखे अधिकारी याचे जिवंत उदाहरण आहेत. आपल्या कारकिर्दीत त्यांनी अनेकदा बेकायदेशीर कामांवर कारवाई केली, अतिक्रमण हटवले, शिस्त लावण्याचा प्रयत्न केला आणि प्रशासनाला लोकाभिमुख बनवण्याचा प्रयत्न केला. पण त्यांच्या प्रत्येक कारवाईनंतर काही घटकांकडून विरोध झाला. कारण त्यांची कार्यपद्धती अनेकांच्या सोयीसुविधांना धक्का देणारी ठरली.

खरे तर समस्या केवळ व्यवस्थेची नाही; समस्या आपल्या मानसिकतेची आहे. आपण लाखो रुपयांची मालमत्ता विकत घेतो, पण कर भरण्याच्या वेळी मात्र हात आखडता घेतो. सार्वजनिक सुविधांचा लाभ घ्यायचा असतो, पण त्यासाठी आवश्यक असलेल्या नियमांचे पालन करायला आपण तयार नसतो. वाहतुकीचे नियम मोडतो, रांगेत उभे राहण्याऐवजी ओळखीचा वापर करतो, कचरा सार्वजनिक ठिकाणी टाकतो आणि नंतर शहर अस्वच्छ असल्याबद्दल प्रशासनाला दोष देतो.

भ्रष्टाचाराविरोधात बोलताना आपण आघाडीवर असतो; मात्र स्वतःचे काम लवकर व्हावे म्हणून सेटिंग शोधण्यासही मागेपुढे पाहत नाही. भेसळयुक्त वस्तूंविरोधात संताप व्यक्त करतो, पण स्वस्त मिळत असेल तर गुणवत्तेकडे दुर्लक्ष करतो. प्रामाणिक अधिकारी हवा असतो, पण तोच अधिकारी नियम सर्वांसाठी समानपणे लागू करू लागला की अस्वस्थता निर्माण होते.

आज समाजात एक विचित्र समज निर्माण झाला आहे. जो अधिकारी बेकायदेशीर बांधकामांवर कारवाई करतो तो कठोर वाटतो, अतिक्रमण हटवतो तो लोकविरोधी वाटतो, भेसळखोरांवर धाडी टाकतो तो प्रसिद्धीच्या हव्यासापोटी काम करतो असे म्हटले जाते. उलट, कोणतीही ठोस कारवाई न करणारा अधिकारी चांगला म्हणून ओळखला जातो. ही मानसिकता बदलल्याशिवाय समाजातील अनेक समस्या सुटणार नाहीत.

खरे पाहता, तुकाराम मुंढे यांच्यासारखे अधिकारी समाजासमोर आरसा धरतात. त्या आरशात व्यवस्थेतील त्रुटी दिसतातच; पण त्याहून अधिक आपल्या नागरिक म्हणून असलेल्या कमतरताही दिसतात. म्हणूनच अनेकांना असे अधिकारी खटकतात. कारण ते आपल्या सोयीस्कर दांभिकतेला आव्हान देतात.

भेसळ फक्त अन्नपदार्थांमध्ये किंवा औषधांमध्ये नसते. भेसळ विचारांमध्येही असते. प्रामाणिकतेची भाषा आणि स्वार्थी वर्तन, नियमांची अपेक्षा आणि स्वतःचा नियमभंग, चांगल्या प्रशासनाची मागणी आणि चुकीच्या गोष्टींना मूक पाठिंबा हीदेखील भेसळच आहे.

आज गरज आहे ती केवळ प्रामाणिक अधिकाऱ्यांच्या समर्थनाची नाही, तर प्रामाणिक नागरिक घडविण्याची. एखाद्या अधिकाऱ्याची बदली थांबवण्यासाठी आंदोलन करण्यापेक्षा आपल्या स्वतःच्या चुकीच्या सवयी बदलणे अधिक महत्त्वाचे आहे. कारण समाजाचे खरे परिवर्तन प्रशासनातून नव्हे, तर नागरिकांच्या वर्तनातून सुरू होते.

देशाला तुकाराम मुंढे यांच्यासारख्या धाडसी आणि प्रामाणिक अधिकाऱ्यांची नक्कीच गरज आहे. पण त्याहून मोठी गरज आहे अशा अधिकाऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणाऱ्या जागरूक, जबाबदार आणि प्रामाणिक नागरिकांची. जोपर्यंत प्रामाणिक माणूस एकटा लढत राहील आणि स्वार्थी प्रवृत्ती संघटित राहतील, तोपर्यंत बदलाचा वेग मंदच राहील. मात्र ज्या दिवशी सज्जन, नियमपालक आणि समाजहिताची जाणीव असलेले नागरिक एकत्र येतील, त्या दिवशी व्यवस्था बदलण्यासाठी फार काळ लागणार नाही.

समाज परिवर्तनाचा मार्ग प्रशासनाच्या दालनातून नव्हे, तर प्रत्येक नागरिकाच्या मनातून जातो. आणि म्हणूनच आजचा खरा प्रश्न असा आहे की, आपण तुकाराम मुंढे यांच्यासारख्या अधिकाऱ्यांची अपेक्षा करतो; पण आपण स्वतः कितपत जबाबदार नागरिक आहोत?

**-मच्छिंद्र ऐनापुरे,**
जत जि.सांगली

# पाकव्याप्त काश्मीरमधील आंदोलनाचा भारताने फायदा घ्यावा

भारताचे तुकडे करून काश्मीरला स्वतंत्र राष्ट्र करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या पाकिस्तानचेच आणखी तुकडे होण्याची वेळ आली आहे असे म्हणावे लागेल कारण पाकिस्तानमधील बलुचिस्तान आणि सिंध प्रांतातील नागरिक पाकिस्तानच्या दडपलशाहीला कंटाळून पाकिस्तानमधून स्वतंत्र होण्यासाठी झटत असताना आता पाकव्याप्त काश्मीरमधील नागरिकही पाकिस्तानच्या दडपशाहीविरुद्ध रस्त्यावर उतरून आंदोलन करून पाकिस्तानातून अलग होऊन भारतात सामील होण्यासाठी आंदोलन करत आहेत. बलुचिस्तानला पाकिस्तानपासून स्वतंत्र करण्यासाठी बलुचिस्तान लिबरेशन आर्मी पाकिस्तानशी सशस्त्र लढा देत आहे.

पाकिस्तान आर्मी आणि बलुचिस्तान लिबरेशन आर्मी यांच्यात सतत लढाई सुरू असते. सिंध प्रांतातील नागरिकही पाकिस्तानच्या दडपशाहीला कंटाळून रस्त्यावर उतरून पाकिस्तान सरकार विरुद्ध घोषणाबाजी करत स्वतंत्र सिंध राष्ट्राची मागणी करत असतात. आता पाकव्याप्त काश्मीरमधील नागरिक तर थेट आम्ही भारतात सामील होऊ इच्छितो म्हणत रस्त्यावर उतरून आंदोलन करत आहेत. मागील काही काळापासून पाकव्याप्त काश्मीरमधील नागरिक पाकिस्तान सरकारच्या दडपशाहीचा सामना करत आहेत. पाकिस्तान सरकार पाकव्याप्त काश्मीरमधील नागरिकांकडे दुर्लक्ष करत असून येथील नागरिकांना पुरेशा प्रमाणात सुविधा उपलब्ध करून देत नाही.

पाकिस्तानमधील सरकार पाकव्याप्त काश्मीरमधील साधनसंपत्तीचे शोषण करत असून नागरिकांना कोणत्याही सुविधा देत नाही त्यामुळे तेथील नागरिकांमध्ये पाक सरकार विरुद्ध प्रचंड असंतोष होता त्यात पाकव्याप्त काश्मीरमध्ये निर्मिती केल्या जाणाऱ्या विजेचे प्रचंड बिल पाकिस्तान सरकार इथल्याच नारिकांकडून वसूल करत असल्याने पाकव्याप्त काश्मीरमधील नागरिक पाक सरकार विरुद्ध रस्त्यावर उतरले आहे. या आंदोलनाचे नेतृत्व जॉइंट अवामी ॲक्शन कमिटी (जेएएसी) ही संघटना करत आहे.

पाकिस्तान या संघटनेला दहशतवादी संघटना म्हणत असली तरी या संघटनेत डॉक्टर, इंजिनिअर, वकील यासारखे उच्चशिक्षित लोक आहेत. ही संघटना आपल्या न्याय मागण्यांसाठी रस्त्यावर उतरल्या नंतर घाबरलेल्या पाकिस्तान सरकारने हे आंदोलन चिरडण्यासाठी केलेल्या गोळीबारात २० हून अधिक आंदोलकांचा बळी गेला आहे. अर्थात ही आकडेवारी पाकिस्तान सरकारची आहे. प्रत्यक्षात यापेक्षा अधिक लोकांचा बळी गेला असल्याची शक्यता पत्रकारांनी व्यक्त केली असून या गोळीबाराचा जगभरातून निषेध व्यक्त केला जात आहे. ब्रिटनमधील ५० संसद सदस्यांनी पाकव्याप्त काश्मीरमधील परिस्थिवर चिंता व्यक्त केली असून युरोपातील काही शहरात पाकिस्तानच्या अत्याचाराविरोधात निदर्शने करण्यात आली आहे.



भारतानेही पाकव्याप्त काश्मीरमधील परिस्थितीवर चिंता व्यक्त करत पाकव्याप्त काश्मीरमध्ये झालेल्या गोळीबाराला मानवी संहार असे म्हटले असून यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायाने पाकिस्तानला जबाबदार धरावे अशी मागणी केली आहे. पाकिस्तानने मात्र नेहमीप्रमाणे या आंदोलनाला भारताची फूस असल्याचे म्हणत या आंदोलनासाठी भारताला जबाबदार धरले आहे. हे आंदोलन करणारी जे ए ए सी ही संघटना गद्दार असून या संघटनेला भारताकडून आर्थिक पाठबळ पुरवले जात असल्याचा आरोप पाकिस्तान सरकारने केला आहे अर्थात भारताने हा आरोप फेटाळला असून पाकिस्तानमधील नागरिक सरकार विरुद्ध रस्त्यावर का उतरत आहेत याचे आत्म परीक्षण करण्याचा सल्ला पाकिस्तान सरकारला भारताने दिला आहे.

बलुचिस्तान, सिंध प्रांत आणि पाकव्याप्त काश्मीरमधील साधन संपत्तीचा पाकने वापर करून घेतला पण तेथील नागरिकांना मूलभूत सुविधा पुरवल्या नाहीत. तेथील नागरिकांवर सतत अन्याय अत्याचार केला. तेथील नागरिकांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला. नागरिकांवर बळाचा वापर करून दडपशाही केली. तेथील नागरिकांचे जगणे मुश्किल केले. महागाई प्रचंड वाढवली. तेथील नागरिकांना एकवेळेचे पुरेसे अन्न मिळणे देखील मुश्किल झाले म्हणूनच पाकव्याप्त काश्मीरमधील या आंदोलनात आम्हाला एकवेळेचे अन्न देखील मिळत नाही. अन्नासाठी आम्ही भारतातही जाऊ शकतो असे दावे काही आंदोलकांनी केले. काही आंदोलकांनी तर थेट भारतात सामील होण्याची मागणी केली. अर्थात भारताने या मागणीवर कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही मात्र आज ना उद्या भारताला यावर बोलावेच लागेल. वास्तविक भारतासाठी ही सुवर्णसंधी आहे. पाकव्याप्त काश्मीरमधील नागरिकांच्या या असंतोषाचा फायदा घेऊन भारताने पाकव्याप्त काश्मीर पाकिस्तानधून मुक्त करून भारताला जोडण्यासाठी प्रयत्न करावा अर्थात हे वाटते तितके सोपे नाही हे जरी मान्य केले तरी तरी यानिमित्ताने चालून आलेली ही संधी भारताने साधायला हवी हे ही तितकेच खरे आहे.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे

# जिल्ह्यात टँकरची संख्या ३२ वरून १४ वर

**नांदेड (प्रतिनिधी)** –जिल्ह्यात पाणीटंचाई निवारणासाठी राबविण्यात येत असलेल्या विविध उपाययोजनांचा सकारात्मक परिणाम यावर्षी स्पष्टपणे दिसून येत आहे. सन २०२४–२५ च्या उन्हाळ्यात जिल्ह्यात ३२ टँकरव्दारे पाणीपुरवठा करण्यात येत होता. मात्र सन २०२५–२६ मध्ये ही संख्या केवळ १४ वर आली असून, प्रभावी नियोजन, सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि वेळेवर राबविण्यात आलेल्या उपाययोजनांमुळे पाणीटंचाईची तीव्रता मोठ्या प्रमाणात कमी करण्यात यश आले आहे.




जिल्ह्यात जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या विविध ग्रामीण पाणीपुरवठा योजनांची प्रगती, जलसंधारण उपक्रम तसेच भूजल पुनर्भरणासाठी हाती घेण्यात आलेल्या उपाययोजनांचा हा सकारात्मक परिणाम असल्याचे दिसून येत आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या मार्गदर्शनाखाली योजनांचा नियमित आढावा घेण्यात येत असून आवश्यक त्या ठिकाणी तातडीने उपाययोजना केल्या जात आहेत.

भूजल पातळी वाढविण्यासाठी जिल्ह्यात विविध ठिकाणी रिचार्ज शाफ्टची कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत. तसेच जी–रामजी अंतर्गत गावांमधील जुन्या बोअरवेल परिसरात जलतारा उपक्रम राबविण्यात येत असून भूजल पुनर्भरणाला चालना देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या उपक्रमांमुळे भविष्यात पाण्याची उपलब्धता अधिक शाश्वत होण्यास मदत होणार आहे.

यापुढे जिल्ह्यात पाण्याची शाश्वत उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी शाश्वत भूजल बळकटीकरण समिती अंतर्गत मोठ्या प्रमाणावर जलसंधारणाची कामे हाती घेण्यात येणार आहेत. यामध्ये पावसाच्या पाण्याचे संधारण, भूजल पुनर्भरण, जलस्रोतांचे संवर्धन, रिचार्ज शाफ्ट उभारणी तसेच विविध जलसंधारण संरचनांच्या निर्मितीवर विशेष भर दिला जाणार आहे. या उपाययोजनांमुळे भूजल पातळी वाढण्यास मदत होऊन भविष्यातील पाणीटंचाईच्या समस्येवर दीर्घकालीन आणि शाश्वत तोडगा निघण्यास मदत होणार आहे.

ग्रामीण आरोग्य सेवांना सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रांना नळ पाणीपुरवठा जोडणी देण्याचे विशेष अभियान हाती घेण्यात आले आहे. जिल्ह्यातील ७० प्राथमिक आरोग्य केंद्रांपैकी पहिल्या टप्प्यात ४० केंद्रांची निवड करण्यात आली असून त्यापैकी २० केंद्रांमध्ये काम पूर्ण करून पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली व ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता राहुल रावसाहेब तसेच जिल्हा परिषद प्रशासनाच्या समन्वित प्रयत्नांमुळे पाणीटंचाईवर प्रभावीपणे मात करण्यात यश येत आहे. परिणामी टँकरवरील अवलंबित्व कमी झाले असून ग्रामीण भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

यावर्षी संभाव्य एल–निनो परिस्थितीचा विचार करून प्रशासनाकडून आवश्यक खबरदारी घेतली जात आहे. आगामी काळात जलजीवन मिशनच्या योजनांसोबतच शाश्वत भूजल बळकटीकरण समितीच्या माध्यमातून जिल्हाभर व्यापक जलसंधारण व भूजल पुनर्भरणाची कामे राबविण्यात येणार आहेत. पिण्याच्या पाण्याची शाश्वत उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी विविध विभागांच्या समन्वयातून दीर्घकालीन उपाययोजनांवर भर देण्यात येणार असल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी दिली.

# कसारपेठ येथे हातभट्टी दारू अड्ड्यावर धाड हजारो रुपयांचे रसायन आणि साहित्य नष्ट

## यापुढे गावात हातभट्टी दारू आढळल्यास पोलीस पाटील, सरपंच, ग्रामसेवकावर गुन्हे दाखल होणार

**माहूर (प्रतिनिधी)** – माहूरचे पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांनी तालुक्यातील मौजे कासारपेठ येथील शेतात असलेल्या गोठ्याच्या समोरील लिंबाच्या झाडाखाली हातभट्टी दारू काढण्यासाठी जमाविलेले रसायन मोहफुल व इतर साहित्य धाड टाकून नष्ट केले. याप्रकरणी एका शेतमालकाविरुद्ध गुन्हा दाखल केल्याची घटना गुरुवार, दि. ११ जून रोजी दुपारी १२.३० च्या सुमारास घडली.



पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी किरण कुमार भोंडवे यांच्या आदेशाने पोलीस निरीक्षक देविदास चोपडे हे अवैध धंद्याविरुद्ध स्वतः धाडी टाकत आहेत. या धाडीत त्यांनी हातभट्टी दारू विरुद्ध आक्रमक पवित्रा घेत आहेत. अवैध दारूविषयीची माहिती खबऱ्याकडून मिळताच हातभट्टी दारू काढणे सुरू करण्याआधीच धाड टाकून हातभट्टीवाल्याचे मनसुबे उधळत आहेत. अशा प्रकारे दोन दिवसाआधीच पापलवाडी येथे मोठी कारवाई करण्यात आली आहे. आता ज्या गावात हातभट्टी दारू पकडण्यात आली त्या गावात पोलीस निरीक्षक देविदास चोपडे हे स्वतः जनजागरण करीत आहेत, तर नवीन कायद्यानुसार आता पोलीस पाटील, सरपंच, ग्रामसेवक यांना जबाबदार धरून त्यांच्यावरही कारवाई केली जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली आहे. खबऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार मौजे कासारपेठ येथे शेतातील गोठ्यासमोर असलेल्या लिंबाच्या झाडाखाली हातभट्टी दारू काढण्यासाठी असलेल्या प्लास्टिक टाक्या, मोहफुल आणि रसायन असा एकूण २५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# वांगी ग्रामपंचायत वार्ड आरक्षण जाहीर; सात पैकी चार जागा महिलांसाठी आरक्षित

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड तालुक्यातील वांगी येथील ग्रामपंचायतचे प्रभागनिहाय आरक्षण सोडत काढण्यात आली. या सोडतीमध्ये ७ जागेसाठी आरक्षण मंडळ अधिकारी पी. पी. बडवणे यांच्या उपस्थितीत ग्रामसभा घेऊन जाहीर करण्यात आले.

नांदेड तालुक्यातील आगामी ग्रामपंचायत निवडणुकीसाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अधिपत्याखाली उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांच्या आदेशानुसार नांदेड तहसीलदार संजय वारकड यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाधिकारी पी. पी. बडवणे, तलाठी दिलीप पवार, ग्रामसेवक ए. डी. धर्माधिकारी यांच्या उपस्थितीत ग्रामपंचायत कार्यालय वांगी येथे ११ जून रोजी प्रभागनिहाय आरक्षण सोडत जाहीर करण्यात आले.

२०११ च्या जनगणने–नुसार एकूण लोकसंख्या १४०४ आधारे सात जागांपैकी चार जागा महिलांसाठी तर तीन पुरुषांसाठी सोडण्यात आल्या आहेत. प्रभाग क्रमांक १ अनु. जाती राखीव, सर्वसाधारण महिला दोन जागा, प्रभाग क्रमांक २ अनुसूचित जाती महिला राखीव, सर्व साधारण महिला, सर्वसाधारण तीन जागा, प्रभाग क्रमांक ३ ना.मा.प्र.राखीव व सर्व साधारण महिला दोन जागा असे आरक्षण सोडत काढण्यात आली आहे.

# ‘स्वारातीम’ विद्यापीठात मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त १०० वृक्षांचे रोपण

**नांदेड (प्रतिनिधी)**– राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ परिसरात १०० वृक्षरोपांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि उच्च शिक्षण विभाग, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला हा हरित उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.



या विशेष उपक्रमांतर्गत विद्यापीठ परिसरात विविध प्रकारच्या फळझाडांसह पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड करण्यात आली. वृक्षलागवडीच्या माध्यमातून पर्यावरण संरक्षण, जैवविविधतेचे संवर्धन आणि हरित परिसर निर्मितीचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी वृक्षसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, वृक्षलागवड ही केवळ एक दिवसाची मोहीम नसून पर्यावरण रक्षणाची दीर्घकालीन जबाबदारी आहे. विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिकांनी वृक्षारोपणासोबतच त्यांचे संगोपन करण्यालाही प्राधान्य द्यावे. वाढदिवस आणि इतर महत्त्वाचे समारंभ पर्यावरणपूरक उपक्रमांनी साजरे करण्याची संस्कृती समाजात रुजविणे ही काळाची गरज आहे.

विद्यापीठात सामाजिक बांधिलकी जपत विविध पर्यावरणपूरक आणि जनहिताचे उपक्रम सातत्याने राबविले जात असून, अशा उपक्रमांमधून समाजासमोर आदर्श निर्माण करण्याची परंपरा जोपासली जात असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

# महावितरणकडून शेतकऱ्यांना ८.८१ कोटी रुपयांचा परतावा

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यात कृषी वीज जोडणीसाठी डिमांड भरलेल्या, परंतु सरकारच्या सौरऊर्जा कृषी धोरणाचा भाग म्हणून किंवा इतर अनेक कारणांस्तव वीज जोडणी न झालेल्या १०८८५ प्रलंबित कृषी ग्राहकांना महावितरणकडून नियमानुसार ८,८१,५५,०३५ रुपयांच्या धनादेशांचे परतावा म्हणून वितरण करण्यात आल्याची माहिती नांदेड मंडल कार्यालयामार्फत कळविण्यात आली आहे.

नांदेडसह राज्यात सर्वत्र पारंपरिक कृषी वीज जोडण्याऐवजी सौर कृषीपंप जोडण्या देण्याचे धोरण आहे. मागच्या काळात काही कृषीपंप धारकांनी जोडणीसाठी डिमांड म्हणून पैसे भरलेले होते, परंतु सौरऊर्जा धोरणामुळे किंवा इतर काही कारणांमुळे पैसे भरलेल्यांपैकी सुमारे १०८८५ शेतकऱ्यांना जोडण्या देण्यात आलेल्या नाहीत. तशा प्रलंबित कृषीग्राहकांना महावितरणने नियमानुसार ८ कोटी ८१लाख ५५ हजार ३५ रुपयांच्या धनादेशाव्दारे परतावा दिलेला आहे. अद्यापही उर्वरित काही शेतकऱ्यांना परताव्यांचे पैसे देण्याची प्रक्रिया सुरु आहे. परिमंडल आणि मंडल कार्यालयांच्या सुचनांनुसार महावितरणच्या नांदेड, नांदेड ग्रामीण, भोकर आणि देगलूर विभागीय कार्यालयांनीही पैसे भरुन प्रलंबित असणाऱ्या परंतु, सौरऊर्जा वीज जोडणीची गरज नसणाऱ्या शेतकऱ्यांनी योग्य त्या कागदपत्रांसह विभागीय कार्यालयांशी संपर्क साधण्याचे कळविले आहे.

# गोवारी समाजाच्या १०० विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळांमध्ये प्रवेश

**नांदेड (प्रतिनिधी)** –विशेष मागास प्रवर्गातील गोवारी समाजाच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये प्रवेश देण्याची योजना लागू करण्यात आली आहे. शासन निर्णयानुसार गोवारी समाजातील विद्यार्थ्यांना दरवर्षी जवळच्या शहरांतील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये इयत्ता १ ली ते १२ वीपर्यंत शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी व पालकांनी सामाजिक न्याय भवन, ज्ञानमाता शाळेसमोर, सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, नांदेड या कार्यालयात अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

योजनेअंतर्गत १०० विद्यार्थ्यांची निवड करण्यात येणार असून, निवड झालेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२६–२७ पासून जवळच्या शहरांतील इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळांमध्ये प्रवेश मिळवून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येणार आहे.

# ऑपरेशन यात्री सुरक्षाअंतर्गत परभणी रेल्वे स्थानकावर आरपीएफ नांदेडकडून तीन संशयित चोरट्यांना अटक

**नांदेड (प्रतिनिधी)**– प्रवाशांच्या सुरक्षिततेप्रती असलेली आपली बांधिलकी अधिक दृढ करत रेल्वे सुरक्षा बल नांदेड विभागाने ऑपरेशन यात्री सुरक्षा अंतर्गत परभणी रेल्वे स्थानकावर प्रवाशांच्या सामानाची चोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या तीन संशयितांना अटक केली. रेल्वे प्रवाशांविरुद्ध होणाऱ्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.



गुप्त माहितीच्या आधारे करण्यात आलेल्या विशेष देखरेखी दरम्यान आरपीएफचे एएसआय अमोल वावळे यांनी ९ व १० जून २०२६ रोजी परभणी रेल्वे स्थानकावर तीन संशयित ‘थीफ्ट ऑफ पॅसेंजर बिलाँगिंग्स’ गुन्हेगारांना ताब्यात घेतले.

पहिली कारवाई ९ जून २०२६ रोजी दुपारी दोन वाजता प्लॅटफॉर्म क्रमांक १ वर ट्रेन क्रमांक ५७६५२ मनमाड–हजूर साहिब नांदेड एक्सप्रेसच्या थांब्यादरम्यान करण्यात आली. किरण (वय २५ वर्षे), रा. बीड, हा संशयित मागील जनरल डब्यात चढणाऱ्या प्रवाशांच्या सामानावर डल्ला मारण्याच्या प्रयत्नात असल्याचे आढळून आले. त्यास पुढील कारवाईसाठी जीआरपी परभणीकडे सुपूर्द करण्यात आले. जीआरपीने त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ११० व ११७ अंतर्गत गुन्हा क्रमांक १२२/२०२६ नोंदवून पुढील कारवाई सुरू केली.

यानंतर १० जून २०२६ रोजी प्लॅटफॉर्म क्रमांक ३ वर ट्रेन क्रमांक १७६६१ नागरसोल–काचीगुडा एक्सप्रेसच्या थांब्यादरम्यान विशेष देखरेख सुरू असताना, सुमारे १४:२५ वाजता अनिस (वय ४२ वर्षे), रा. परभणी, यास प्रवाशांच्या सामानाची चोरी करण्याच्या प्रयत्नात पकडण्यात आले. त्यास जीआरपी परभणीकडे सुपूर्द करण्यात आले असून त्याच्याविरुद्ध बीएनएसएस–२०२३ च्या कलम १२८ अंतर्गत गुन्हा क्रमांक २५/२०२६ नोंदवून तपास सुरु करण्यात आला आहे.

# स्वारातीम विद्यापीठात नेत्रदान जनजागृती अभियान; २३ जणांचा नेत्रदानाचा संकल्प

**नांदेड (प्रतिनिधी)** –स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात राष्ट्रीय नेत्रदान दिनाचे औचित्य साधून नेत्रदान जनजागृती अभियान व मोफत नेत्र तपासणी शिबीर उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. विशेष म्हणजे या अभियानातून प्रेरित होऊन २३ जणांनी मरणोत्तर नेत्रदानाचा संकल्प करत नेत्रदान फॉर्म भरला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर हे होते. यावेळी प्र–कुलगुरू डॉ. अशोक महाजन, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, वित्त व लेखाधिकारी डॉ. राजेश शिंदे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर, दूरस्थ शिक्षण संचालक प्रकाश निहलानी, डॉ. राहुल पांढरे, डॉ. पारितोष दत्ता यांची प्रमुख उपस्थिती होती.



कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेले डॉ. राहुल पांढरे यांनी नेत्रदानाचे महत्त्व अधोरेखित करत मरणोत्तर नेत्रदानाबाबत समाजात व्यापक जनजागृती होण्याची गरज व्यक्त केली. वयाच्या ९० वर्षांपर्यंत कोणतीही व्यक्ती नेत्रदान करू शकते. मात्र, याबाबत कुटुंबियांना पूर्वकल्पना देणे आवश्यक आहे. भारताला अंधत्वमुक्त करण्याच्या राष्ट्रीय मोहिमेत प्रत्येकाने नेत्रदानाचा संकल्प करून समाजात जागृती निर्माण करावी, असे आवाहन त्यांनी केले.

या उपक्रमांतर्गत उपस्थित विद्यार्थी, कर्मचारी व अधिकाऱ्यांची तज्ज्ञ डॉक्टर डॉ. राहुल पांढरे, डॉ. पारितोष दत्ता यांच्या मार्गदर्शनाखाली मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. शिबिराला लाभलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे नेत्रदानाविषयी जागरूकता निर्माण होण्यास मोठी मदत झाली.

या नेत्रदान जनजागृती अभियान व मोफत नेत्र तपासणी शिबिरास विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्यासंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मारुती गायकवाड यांनी केले. त्यांनी विद्यापीठाच्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती देत अशा जनहिताच्या मोहिमांची आवश्यकता अधोरेखित केली. यावेळी उपस्थितांचे आभार आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. सुरेखा मुंगल यांनी मानले.

# खाणीतील कामगारांच्या मुला-मुलींना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती अनुदान

**नांदेड (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र व गोवा राज्य तसेच दादरा–नगर हवेली आणि दमण–द्विव केंद्रशासित प्रदेशातील बीडी, सिनी, चुनखडी दगड, डोलोमाईट, लोह–मँगनीज व क्रोम धातूच्या खाणीतील कामगारांच्या मुला–मुलींना शैक्षणिक वर्ष २०२६–२७ साठी शिष्यवृत्ती व आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

योजनेअंतर्गत इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना वार्षिक १ हजार रुपये, इयत्ता ५ वी ते ८ वीपर्यंत १ हजार ५०० रुपये, इयत्ता ९ वी ते १० वीपर्यंत २ हजार रुपये, तर इयत्ता ११ वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांना ३ हजार रुपये आर्थिक सहाय्य दिले जाईल. आयटीआय, पॉलिटेक्निक आणि पदवी अभ्यासक्रम (बीएससी, कृषी पदवीसह) शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना ६ हजार रुपये, तर बीई, एमबीबीएस, एमबीए यांसारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी २५ हजार रुपयांचे अनुदान देण्यात येणार आहे.

अर्ज प्रक्रिया १ जून २०२६ पासून सुरू झाली असून प्री–मॅट्रिक शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ ऑगस्ट २०२६ आहे. पोस्ट–मॅट्रिक शिष्यवृत्तीसाठी ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत अर्ज करता येणार आहेत. पात्रता, अटी व अर्जाची सविस्तर माहिती राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टल (scholarships.gov.in) वर उपलब्ध आहे.

विद्यार्थ्यांनी अर्जासोबत आवश्यक कागदपत्रांच्या स्पष्ट व वाचनीय स्कॅन प्रती अपलोड कराव्यात. अर्ज सादर केल्यानंतर संबंधित शैक्षणिक संस्थेकडून त्याची पडताळणी झाली आहे की नाही, याची खात्री विद्यार्थ्यांनी स्वतः करून घ्यावी. अर्ज पडताळणीची जबाबदारी विद्यार्थ्यांचीच राहणार आहे. निर्धारित मुदतीनंतर प्राप्त झालेले किंवा संस्थेमार्फत पडताळणी न झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

**अर्ज करताना आवश्यक बाबी**

प्रथमच अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांनी OTR (One Time Registration) करणे आवश्यक आहे. अर्जासाठी आधार कार्ड अनिवार्य असून विद्यार्थ्यांचे स्वतंत्र बँक खाते असणे आवश्यक आहे. संयुक्त खाते असल्यास त्यामध्ये विद्यार्थ्याचे नाव प्रथम असावे. पालकांच्या एकापेक्षा अधिक मुलांसाठी प्रत्येक विद्यार्थ्याचे स्वतंत्र खाते असणे आवश्यक आहे. बँक खाते आधारशी संलग्न असावे तसेच विद्यार्थ्याचा स्वतंत्र मोबाईल क्रमांक असावा.

बीडी कामगारांच्या ओळखपत्रावर आश्रित सदस्यांची नावे नमूद असणे आवश्यक आहे. सन २०२५–२६ चे उत्पन्न प्रमाणपत्र राजस्व अधिकाऱ्यांकडून जारी केलेले असावे. उत्पन्न प्रमाणपत्रावर पिवळ्या रंगातील हायलाइट ग्राह्य धरले जाणार नसून हिरव्या रंगातील चिन्ह असणे आवश्यक आहे.

# रामतीर्थमध्ये विकासकामांवर संशयाचे सावट

## ग्रामपंचायत अधिकाऱ्याच्या कोऱ्या कागदांवरील सह्यांमुळे खळबळ; गुत्तेदार-अभियंता संगनमताची चर्चा

**रामतीर्थ (प्रतिनिधी)** –तीर्थक्षेत्र पर्यटन विकास योजनेअंतर्गत रामकुंड परिसरात सुरू असलेल्या विकासकामांबाबत धक्कादायक माहिती समोर येत असून ग्रामपंचायत अधिकाऱ्याने हमीपत्र, ना हरकत प्रमाणपत्र, देखभाल प्रमाणपत्र यांसारख्या महत्त्वाच्या कागदपत्रांवर कोऱ्या कागदांवर सह्या केल्या आहेत. या प्रकारामुळे संपूर्ण कामकाजाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, गावात संशयाचे वातावरण पसरले आहे.

विशेष म्हणजे संबंधित विकास–कामांबाबत ग्रामपंचायत, सरपंच, सदस्य किंवा गावातील नागरिकांना कोणतीही स्पष्ट माहिती देण्यात आली नसल्याचा आरोप आहे. मात्र दुसरीकडे अभियंता, गुत्तेदार आणि ग्रामपंचायत अधिकारी यांच्यातील संपर्कातून कामे सुरू करण्यात आल्याची चर्चा जोर धरू लागली आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, कोऱ्या कागदांवर सह्या घेणे अथवा देणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. अशा सह्यांचा वापर नंतर कोणत्याही प्रकारचे हमीपत्र, ना हरकत प्रमाणपत्र किंवा इतर अधिकृत कागदपत्रे तयार करण्यासाठी केला जाऊ शकतो. त्यामुळे संबंधित कागदपत्रांचा गैरवापर झाला आहे का, याची चौकशी होणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे.

या प्रकरणात आणखी एक गंभीर मुद्दा चर्चेत आला आहे. कोणत्याही अधिकृत प्रक्रियेची माहिती ग्रामपंचायत स्तरावर न देता महत्त्वाच्या कागदपत्रांवर सह्या करण्यात आल्यामुळे संबंधित अधिकाऱ्याने काही आर्थिक तडजोड केली होती का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. जरी याबाबत कोणताही अधिकृत पुरावा समोर आलेला नसला तरी गावात विविध तर्क–वितर्कांना उधाण आले आहे.

ग्रामपंचायत कार्यालयाच्या नोंदी, ठराव किंवा ग्रामसभेची माहिती याशिवाय विकासकामांची प्रक्रिया पुढे नेण्यात आली असल्याचा आरोप होत आहे. जर हे आरोप खरे असतील तर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अधिकारांवर गदा आणण्याचा हा प्रकार मानला जाऊ शकतो, अशी प्रतिक्रिया काही जाणकारांनी व्यक्त केली आहे.

रामतीर्थ येथील नागरिकांनी या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे. कोऱ्या कागदांवरील सह्या नेमक्या कोणत्या कागदपत्रांसाठी वापरण्यात आल्या, त्यातून शासनाची किंवा ग्रामपंचायतीची दिशाभूल झाली का, तसेच संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी काय, याचा तपास होणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. दरम्यान, या आरोपांबाबत संबंधित ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी मी स्वाक्षऱ्या केल्या आहेत असे सांगितले. अभियंता व गुत्तेदार यांची अधिकृत प्रतिक्रिया मिळू शकलेली नाही. त्यांची बाजू समोर आल्यानंतरच या प्रकरणाचे संपूर्ण सत्य स्पष्ट होणार आहे. मात्र कोऱ्या कागदांवरील सह्यांच्या कथित प्रकारामुळे रामतीर्थ ग्रामपंचायत प्रशासनाचा कारभार पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे.

# अंतर्मन

## ‘P’ नावावाले हृदयात दडवतात रहस्ये!

### तुमच्या मित्राच्या किंवा जवळच्या व्यक्तीच्या नावाचे पहिले अक्षर ‘P’ असेल तर जाणून घ्या विशेष गोष्टी...





**एखाद्या व्यक्तीच्या नावाच्या पहिल्या अक्षराला विशेष महत्त्व असते. अंकशास्त्रानुसार, ते व्यक्तीचे व्यक्तिमत्व उघड करू शकते. वास्तु गुरु आणि अंकशास्त्र तज्ञ सांगतात की, ज्या लोकांची नावे ‘P’ या अक्षराने सुरू होतात, त्यांचे व्यक्तिमत्व वैशिष्ट्यपूर्ण असते. ते घाईने निर्णय घेत नाहीत आणि आपल्या मनातील भावना सहजपणे व्यक्त करत नाहीत. ते आपल्या करिअरमध्ये पैसे कमावण्याच्या आणि वाचवण्याच्या कलेत पारंगत असतात. जर ते एखाद्या नात्यात असतील, तर ते त्या नात्यासाठी पूर्णपणे वचनबद्ध असतात आणि अत्यंत एकनिष्ठ असतात. चला, ‘P’ अक्षराने नावे सुरू होणाऱ्या लोकांचे व्यक्तिमत्व, करिअर आणि प्रेम जीवन याबद्दल सविस्तरपणे जाणून घेऊया...**

### या नावाच्या लोकांची वैशिष्ट्ये

- विचारपूर्वक निर्णय घेणे : ज्या लोकांची नावे ‘P’ अक्षराने सुरू होतात, ते बाहेरून शांत दिसतात. तथापि, त्यांचे मन नेहमी विचार आणि कल्पनांनी गजबजलेले असते. ते प्रत्येक निर्णय खूप विचारपूर्वक घेतात. ते काळजीपूर्वक विचार केल्याशिवाय कोणतीही गोष्ट स्वीकारत नाहीत.
- रहस्ये स्वतः जवळ ठेवणे : हे लोक आपल्या अत्यंत खासगी आणि वैयक्तिक गोष्टी कोणाशीही शेअर करत नाहीत. हे लोक नेहमी आपली रहस्ये लपवून ठेवतात. त्यांना आपल्या मनातील भावना कोणाशीही शेअर करायला आवडत नाही.
- हट्टी पण निर्मळ मनाचे : ‘P’ नावाचे लोक स्वभावाने थोडे हट्टी असतात. पण त्यांचे मन खूप निर्मळ असते. ते नेहमी इतरांना मदत करण्यास तयार असतात.
- आत्मसन्मानाला प्राधान्य : या लोकांसाठी आत्मसन्मान सर्वात महत्त्वाचा असतो. ते आपली प्रतिमा कधीही डागाळू देत



नाहीत आणि तिची अत्यंत काळजी घेतात. कधीकधी, या स्वभावामुळे लोक त्यांना अहंकारी समजतात.

### ‘P’ नावाच्या लोकांचे करिअर



- यशाच्या मार्गावर हळूहळू प्रगती : वास्तु गुरू आणि अंकशास्त्र तज्ञ म्हणतात की, ‘P’ नावाच्या लोकांना त्यांच्या आयुष्याच्या सुरुवातीच्या काळात काही चढ-उतार आणि कठोर परिश्रमांना सामोरे जावे लागते. पण मध्यम वयापर्यंत ते चांगले पद आणि यश मिळवतात.
- पैसे वाचवण्यात निपुण : ‘P’ नावाचे लोक पैसे कमावणे, बचत करणे आणि चांगल्या प्रकारे खर्च करण्यात निपुण असतात. ते आयुष्यभर मोठ्या प्रमाणात बचत जमा करतात. या नावाच्या व्यक्ती जर त्यांच्या कामाच्या ठिकाणी सकारात्मक ऊर्जा टिकवून ठेवतील, तर त्यांना व्यवसायात चांगली वाढ मिळू शकते.

### प्रेम जीवन कसे?

- प्रेमात एकनिष्ठ : एकदा ‘P’ नावाच्या व्यक्ती प्रेमात पडल्या आणि त्यांनी एकमेकांना मनापासून स्वीकारले की, त्या आपल्या जोडीदाराशी एकनिष्ठ राहतात. त्या आपल्या जोडीदाराचा विश्वास कधीही तोडत नाहीत.
- भावनिक आणि हक्क गाजवणारे : या व्यक्ती कधीकधी त्यांच्या नात्यांमध्ये थोडे जास्तच भावनिक असू शकतात. त्या आपल्या जोडीदाराबद्दल हक्क गाजवणाऱ्या देखील असतात. तथापि, परस्पर सामंजस्य आणि प्रेम हे नाते गोड ठेवतात.
- नातेसंबंध वाचवण्यासाठी त्याग : या व्यक्ती कधीकधी आपले नातेसंबंध वाचवण्यासाठी आणि आपल्या जोडीदाराच्या आनंदासाठी मोठे त्याग करण्यास तयार असतात. कारण त्या प्रत्येक नात्याला मनापासून जपतात.
- आपल्या भावना मोकळेपणाने व्यक्त करू न शकणे : ‘P’ अक्षराने नावे सुरू होणारे लोक अनेकदा आपल्या अंतर्मनातील भावना मोकळेपणाने व्यक्त करू शकत नाहीत. यामुळे कधीकधी त्यांच्या नातेसंबंधात किंवा वैवाहिक जीवनात गैरसमज निर्माण होऊ शकतात. वास्तु गुरू आणि अंकशास्त्र तज्ञ स्पष्ट करतात की, नातेसंबंधात संतुलन, सामंजस्य आणि संवाद राखल्यास त्यांचे वैवाहिक जीवन सुखी आणि शांततापूर्ण राहते.





# भगवान कल्की 23 वर्षांपर्यंत दाखवतील लीला!

## ‘भविष्य मालिके’तून जाणा कलियुगाच्या अंताचे रहस्य...



**कलियुगाच्या या काळात अधर्माने धर्माला गिळून टाकले आहे. अधर्म वेगाने पसरत आहे. जेव्हा धर्म आणि अधर्माचा संघर्ष परमोच्च बिंदूवर पोहोचेल, तेव्हा महाभारताच्या रणांगणावर भविष्यवाणी केल्याप्रमाणे भगवान कल्कींचा जन्म होईल. भगवान कृष्णांच्या निधनानंतर कलियुगाची सुरुवात झाली होती. शहरे वाढत होती, व्यापार विस्तारत होता आणि लोकांच्या खाण्याच्या सवयी बदलत होत्या. कलियुगाची सुरुवात अगदी सामान्यपणे झाली, पण जसजसा तो पुढे सरकत गेला, तसतसे त्याचे परिणाम अधिक स्पष्ट होत गेले. लोकांमध्ये क्रोध, द्वेष, हिंसा, लूटमार, कपट, फसवणूक आणि दुष्टता वाढत होती. ‘भविष्य मालिका’ ही भगवान कल्कींच्या अवताराशी संबंधित अनेक रहस्ये उघड करते. जसे की, भगवान कल्कींचा जन्म केव्हा आणि कोठे होईल, आणि ते पृथ्वीवर किती वर्षे, म्हणजेच किती काळ जगतील. कल्की अवताराबद्दल जाणून घेण्यापूर्वी, आपण कलियुगाचा प्रभाव समजून घेऊया...**

### राजा नल आणि कलियुगाची कथा

राजा नल आणि कलियुगाची कथा महाभारताच्या वन पर्वातील अध्याय ५३ मध्ये वर्णन केलेली आहे. एका स्वयंवरात विदर्भ राज्याची राजकुमारी दमयंतीने निषाद देशाचा पराक्रमी आणि सद्गुणी राजा नल याला आपला पती म्हणून निवडले. अनेक देवदेखील राजकुमारी दमयंतीशी विवाह करण्यासाठी आले होते. तथापि, राजकुमारीने राजा नलाला आपला पती म्हणून स्वीकारले आणि त्याला पुष्पहार घातला. जेव्हा सर्व देव स्वयंवरातून परत येत होते, तेव्हा त्यांची भेट कलियुगाशी झाली. जेव्हा कलियुगाला हे कळले, तेव्हा देवांपेक्षा मानवांना प्राधान्य दिले गेल्याने तो क्रोधित झाला. राजा नलवर सूड घेण्यासाठी कलियुग त्याच्या राज्यात आले आणि त्याने त्याच्या शरीरात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला, परंतु तो सद्गुणी आणि धार्मिक असल्यामुळे अयशस्वी ठरला. सर्वतोपरी प्रयत्न करूनही कलियुग त्याच्या शरीरात प्रवेश करू शकले नाही. १२ वर्षे कलियुग राजा नलाने एखादी चूक किंवा हलगर्जीपणा करावा याची वाट पाहत होते, जेणेकरून ते त्याच्या शरीरात प्रवेश करू शकतील. एके दिवशी संध्याकाळच्या प्रार्थनेच्या वेळी राजा नल आपले पाय न धुता अशुद्ध अवस्थेत बसून प्रार्थना करू लागला, ज्यामुळे कलियुगाने त्याच्या शरीरात प्रवेश केला. कलियुगाचा प्रभाव इतका होता की त्याच्या आगमनानंतर राजा नलाचे मन बदलले. राजा नलाचा भाऊ पुष्कर, ज्याच्या मनात नलाबद्दल तीव्र द्वेष होता, त्याने त्याला बुद्धिबळ खेळण्यासाठी आमंत्रित केले. खेळात हरल्यानंतर नलाने आपले राज्य गमावले आणि त्याला राणी दमयंतीसोबत जंगलात भटकावे लागले. कलियुगामुळेच राजा नल राणी दमयंतीला जंगलात सोडून निघून गेले.

### कल्की अवतार किती काळ टिकेल?

विष्णू पुराण, भविष्य पुराण आणि श्रीमद् भगवद्गीता यांमध्येही कल्की अवताराचे वर्णन आहे. त्यात म्हटले आहे की, जेव्हा अधर्म परमोच्च बिंदू गाठेल, तेव्हा भगवान कल्की धर्माचे रक्षण करण्यासाठी येतील. भविष्य पुराणानुसार, जेव्हा कलियुग परमोच्च बिंदू गाठेल, तेव्हा पापी आचरणात वाढ होईल. यानंतर जेव्हा कलियुगाचा एकूण कालावधी २३ वर्षे असेल, तेव्हा भगवान कल्की अवतार घेतील आणि २३ वर्षे आपली दिव्य कार्ये करतील, ज्या काळात कलियुगाचा अंत होईल. त्यांची दिव्य कार्ये २३ वर्षे टिकतील.

### भगवान कल्कींचा जन्म केव्हा आणि कोठे?



भविष्य मालिका, विष्णू पुराण आणि श्रीमद् भागवत महापुराणानुसार, भगवान विष्णूचा कल्की अवतार कलियुगाच्या छायेत संबल नावाच्या गावात होईल आणि भगवान कल्की यांचा जन्म विष्णूयशा नावाच्या व्यक्तीच्या पोटी होईल. तथापि, देवी भागवतामध्ये विष्णूयशाचे नाव गरुड असे लिहिले आहे, तर पुराणांमध्ये संबल गावाचा उल्लेख आढळतो. कलियुग अवताराबद्दल असे म्हटले जाते की, भगवान कल्की पृथ्वीला पुनर्स्थापित करतील. ते कलियुगाचा अंत करून पापांचा नाश करतील.

# जुलैमध्ये या 5 दिवशी शुभ कार्ये ठरतील अशुभ!

**हिंदू पंचांग चंद्राच्या हालचालींच्या आधारावर तारखांची गणना करते. हिंदू धर्मात सर्व शुभ प्रसंग, सण आणि शुभ कार्ये या तारखांवर आधारित असतात. प्रत्येक महिन्यात ३० तारखा असतात: १५ शुक्ल पक्षासाठी आणि १५ कृष्ण पक्षासाठी. या तारखांची पाच वेगवेगळ्या भागांमध्ये विभागणी देखील केली जाते. या तारखांना संबंधित कार्ये केल्यास मोठे फायदे आणि यश मिळू शकते. त्यामुळे या तारखांची विशेष काळजी घेतली पाहिजे. चला, या विशेष तारखांबद्दल आणि जुलै महिन्यात रिक्तता स्थिती केव्हा निर्माण होईल, तसेच या काळात कोणती कार्ये करावीत आणि कोणती करू नयेत याबद्दल जाणून घेऊया...**



### तारखांचे किती प्रकार आहेत?

पंडित राकेश झा स्पष्ट करतात की, नंदा, भद्रा, जया, पूर्णा आणि रिक्ता असे पाच प्रकार आहेत. यापैकी पहिली तारीख नंदा तिथी आहे, जी प्रतिपदेला सुरू होते. त्यानंतर भाद्र द्वितीयेला सुरू होते, तृतीया तिथी जया आहे. चतुर्थी रिक्ता तर पंचमीला पूर्णा येते. यानंतर षष्ठी तिथी नंदा, भाद्र सप्तमी असा क्रम सुरू राहतो. हे लक्षात घ्यावे की या पाच तारखांव्यतिरिक्त शून्य तिथी देखील असते.

### जुलैमध्ये रिक्ता तिथी केव्हा येईल?

- ४ जुलै, २०२६ : चतुर्थी तिथी शनिवारी येत असल्याने रिक्ता तिथीचा दोष दूर झाला आहे आणि सिद्ध योग तयार झाला आहे.
- ९ जुलै, २०२६ : नवमी तिथी
- १३ जुलै, २०२६ : चतुर्दशी तिथी
- १७ जुलै, २०२६ : चतुर्थी तिथी
- २२ जुलै, २०२६ : नवमी तिथी
- २८ जुलै, २०२६ : चतुर्दशी तिथी

पंचांगानुसार, जुलै महिन्यात सहा रिक्ता तिथी आहेत. या काळात कोणतेही शुभ कार्य करण्यास मनाई आहे. असे मानले जाते की रिक्ता तिथीला केलेल्या कर्मामुळे दीर्घकाळ यश मिळत नाही. त्यामुळे या काळात कोणतेही नवीन काम सुरू करू नये, तथापि, शस्त्रक्रिया किंवा आजारावरील उपचार यांसारखी त्वरित लाभ देणारी कामे हाती घेऊ शकता.

### कोणती कामे कोणत्या तारखेला नको?

- नंदा तिथी : नवीन व्यवसाय सुरू करण्यासाठी ही तारीख अत्यंत शुभ मानली जाते. शिवाय, या काळात तुम्ही नवीन घराचे बांधकाम देखील सुरू करू शकता. नंदा तिथीमध्ये सहावी आणि अकरावी तिथी समाविष्ट आहे.
- भाद्र तिथी : या तारखांना धान, धान्य, गायी, म्हशी किंवा वाहने खरेदी करण्यासारखी शुभ कामे केली जाऊ शकतात. असे म्हटले जाते की या काळात केलेल्या खरेदीत अनेक पटींनी वाढ होते. भाद्र तिथीमध्ये दुसरी, सातवी आणि बारावी तिथी समाविष्ट आहे.
- जया तिथी : या तारखांना न्यायालयीन खटले निकाली काढणे फायदेशीर ठरते. या तारखांना तुम्ही वाहन खरेदी करण्यासारखी कामे देखील करू शकता. तृतीया, अष्टमी आणि त्रयोदशी तिथी या जय तिथी म्हणूनही ओळखल्या जातात.
- रिक्त तिथी : गृहस्थांनी या तारखांना कोणतेही काम करू नये. किंबहुना, तांत्रिक विधी पूर्ण करण्यासाठी ही तारीख शुभ मानली जाते. त्यामुळे, गृहस्थांनी कोणत्याही कामासाठी या तारखा टाळाव्यात. वक्ती तिथी: चतुर्थी, नवमी आणि चतुर्दशी.
- पूर्णा तिथी : पूर्णा तिथीला साखरपुडा, टिळा आणि विवाह यांसारखे शुभ विधी करणे शुभ मानले जाते. पूर्णा तिथीमध्ये पंचमी, दशमी आणि पौर्णिमा तिथीचा समावेश होतो.

# अंत्ययात्रेत का म्हणतात ‘राम नाम सत्य है...’

**‘राम नाम सत्य है, सत्य बोलो मुक्ती है...’ अंत्ययात्रेत म्हटला जाणारा हा मंत्र मृताच्या मुक्तीचा आणि जिवितांसाठी एका संदेशाचा स्त्रोत आहे. जेव्हा एखादी व्यक्ती हे जग सोडून जाते, तेव्हा तिच्यामागे येणारे नातेवाईक आणि समाजातील सदस्य सांसारिक आसक्तींमध्ये बुडून जातात. ‘राम नाम सत्य है’चा जप केल्याने त्यांना आठवण होते की हे भौतिक शरीर, संपत्ती आणि नाती सर्व नश्वर, म्हणजेच तात्पुरती आहेत; केवळ रामाचे नावच शाश्वत आणि अंतिम सत्य आहे.**

संस्कृत, व्याकरण आणि अध्यात्माच्या दृष्टिकोनातून ‘राम’ या शब्दाचा अर्थ केवळ दशरथाच्या पुत्रापुरता मर्यादित नाही. ‘र’ म्हणजे प्रकाश आणि ‘म’ म्हणजे आत. जो विश्वाच्या प्रत्येक कणात वास करतो, म्हणजेच जो अस्तित्वात आहे, आणि ज्याचे अस्तित्व चेतनेचा स्त्रोत आहे, तो राम आहे. अशाप्रकारे, राम हे नाव निराकार, सर्वव्यापी आणि जन्म-मृत्यूच्या पलीकडे असलेल्या ब्रह्माचे प्रतीक आहे. अंत्ययात्रेदरम्यान राम नावाचा उच्चार केला जात असला तरी अंत्ययात्रेचा अंतिम समारोप भगवान शिवाच्या उपस्थितीत होतो. स्मशानभूमीला महादेवाचे निवासस्थान मानले जाते. जेव्हा पंचतत्त्वांनी बनलेले शरीर अग्नीत विलीन केले जाते, तेव्हा त्याची राख होते, जी नंतर भगवान शिव आपल्या संपूर्ण शरीराला लावतात. या संपूर्ण प्रक्रियेत हरि आणि हर, म्हणजेच राम आणि शिव, या दोघांचाही समावेश आहे. अंतिम यात्रेला निघताना हरि, म्हणजेच राम, या नावाचा जप केला जातो आणि अंतिमतः, हर, म्हणजेच शिव या तत्त्वाद्वारे आत्म्याला मोक्ष आणि मुक्ती मिळते. दोघांमध्ये कोणताही भेद नाही; शिव हेच राम आहेत आणि राम हेच शिव आहेत. भगवान शिव स्वतः ‘राम’ नावाचा जप करतात आणि



पार्वतीला त्याचे महत्त्व समजावून सांगतात, राम रामेति रामेति रमे रामे मनोरमे, सहस्त्र नाम तत्तुल्यं राम नाम वराननेे। अंत्ययात्रेदरम्यान ‘राम नाम’ चा सतत जप केल्याने स्मशानभूमीकडे जाणाऱ्या मार्गावर एक संरक्षक कवच निर्माण होते, जे कोणत्याही नकारात्मक शक्तीला किंवा भुताला मृतदेहाला स्पर्श करण्यापासून रोखते. अंत्ययात्रेदरम्यान ‘राम नाम सत्य है’ चा जप केल्याने मृताच्या मुक्तीची खात्री होते, तसेच शवपेटी उचलणाऱ्या चार व्यक्ती आणि मागे चालणाऱ्या प्रियजनांची जागृती होते. म्हणूनच, ‘राम नाम सत्य है, सत्य बोलो मुक्ती है’ याचा वारंवार जप केला जातो, ज्याचा अर्थ असा आहे की कल्याण, मुक्ती आणि मोक्षाचा मार्ग मायेचा त्याग करून भगवंताचे नाव सत्य म्हणून स्वीकारण्यात येत आहे.

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.३५५

नाव परिवर्तन वार्ड क्र. १८ अ मालमत्ता क्र. ७४३ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, अब्दुल कलीम अब्दुल सरवर रा. रहिम कॉलनी हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ७३४ न. १८ अ अझहर अली सरदार अली यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ७८५/२०२६ दि. ०५/०६/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.
पूर्वेस – कॉलनी रस्ता, पश्चिमेस – प्लॉट नं. १२७, दक्षिणेस – प्लॉट नं. १३८, उत्तरेस – प्लॉट नं. १४०

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.३५४

नाव परिवर्तन वार्ड क्र. १८ मालमत्ता क्र. १२६ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, शेख पांडुरंग आनंदराव वानखेडे रा. परमश्वेर गल्ली हिमातयनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. १२६ वार्ड न. १८ संयज सिद्धेश्वर कंचर्लावार यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ७८२/२०२६ दि. ०४/०६/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.
पूर्वेस – प्लॉट नं. १२७, पश्चिमेस – प्लॉट नं. १२५, दक्षिणेस – मारोती काळे यांचे शेत, उत्तरेस – रस्ता.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.३५३

नाव परिवर्तन वार्ड क्र. १८ मालमत्ता क्र. १२५ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, बालाजी गणेश वानखेडे रा. नेहरूनगर हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. १२५ वार्ड न. १८ संजय सिद्धेश्वर कंचर्लावार यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ७८१/२०२६ दि. ०४/०६/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.
पूर्वेस – प्लॉट नं. १२६, पश्चिमेस – प्लॉट क्र. १२४, दक्षिणेस – मारोती काळे यांचे शेत, उत्तरेस – रस्ता.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.३५२

नाव परिवर्तन वार्ड क्र. १५ मालमत्ता क्र. १३२ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, शेख सत्तार शेख मन्सुर रा. रहिम कॉलनी हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. १३२ वार्ड न. १५ शेख रफीक शेख अमिर यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ७३०/२०२६ दि. २५/०५/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.
पूर्वेस – सय्यद शहबाज यांची प्लॉटींग, पश्चिमेस – २० फुटाचा रस्ता, दक्षिणेस – प्लॉट नं. ७२५, उत्तरेस – प्लॉट नं. २३.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.३५१

नाव परिवर्तन वार्ड क्र. ०२ मालमत्ता क्र. २६ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, मथुराबाई लक्ष्मण भोयर रा. हिमातयनगर मोहल्ला हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. २६ वार्ड न. ०२ लक्ष्मण चिमनाजी भोयर यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ----/---- दि. ०३/०६/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.
पूर्वेस – रोड, पश्चिमेस – विश्वांभर चर्लावार यांचे घर, दक्षिणेस – संतोष गाजेवार यांचे घर, उत्तरेस – बाबुराव भोयर यांचे घर.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.३४८

नाव परिवर्तन वार्ड क्र. १८ मालमत्ता क्र. ६५२ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, शेख इस्माईल शेख रहिम रा. खुबा चौक हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ६५२ वार्ड न. १८ शहबाजर अहेमद अब्दुल हफीज यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ७३२/२०२६ दि. २५/०५/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.
पूर्वेस – अब्दुल मतीन अब्दुल मलीक यांची जागा, पश्चिमेस – २५ फुटाचा रस्ता, दक्षिणेस – प्लॉट नं. ३३, उत्तरेस – प्लॉट नं. ३०.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## Change In Name

My Old Name is **THAKUR AKSHAYKUMAR GANESHSINH** which now I am changing as New Name **AKSHAY SINGH GANESH SINGH THAKUR** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
Address - 390 Near Muk-badhir School, Maganpura, Nanded Maharashtra 431601
Mo.No. 8888388245

## Change In Name

My Old Name is **SK. M. RIYAJ M. IBRAHIM** which now I am changing as New Name **MOHAMMAD RIYAZ MOHAMMAD IBRAHIM** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
Address - Shri Nagar, Nanded
Mo.No. 9822619097

## मार्कमेमो हरवला

माझी विकास मोहन दिडशेरे या नावाची इयत्ता दहावी पासची टी. सी. बिलोली ते धर्माबाद बस प्रवासात गहाळ झाली असून कोणाला सापडल्यास खालील पत्त्यावर कळविणे ही विनंती

**– संपर्क पत्ता –**
**विकास मोहन दिडशेरे**
**रा. पाटोदा थडी**
**ता. धर्माबाद जि. नांदेड**
**मो. नंबर ९८ ३४ ९४ ३१ १३**

## VEHICL FOR SALE

| Vech No. | Year | Model |
|---|---|---|
| MH-26-BC-0193 | 2017 | VEHICLE FOR SALE |

Offer for sale of Vehicle on As is Where is Basis

HONDA - AMAZE DIESEL

All offer may of exclusive of TAX where applicable. The purchaser shall have to take all necessary steps for transferring the vehicle in his name with the RTO. Offer should reach us on or before 18/06/2028 Offer eath aftar the the company reserve the right to reject ject any or all the offer without assigning any reason what so ever. The company does not undertake any responsibility for non-reces/alay of offer document Tra sold date the company The offer should be sent to the following address.

SUNDARAM FINANCE LIMITED
IInd Floor, Parmar Complex, Bafna T-Point, Nanded 431601
8108157969, 8108151742

## Change In Name

My old name is **SHAMEEM BEGUM** which is now i am changing New name **SHAMIM BEGUM SAYYED YUNUS** hence forth my all correspondence will be done as per my new name, please consider the name.
Address :-BAJAR GALLI MUDKHED, NANDED, MAHARASHTRA 431806
Mobile No 9764696992

## Change In Name

My old name is **SYED BABU** which is now i am changing New name SAYYED **YUNUS SAYYED MIR** hence forth my all correspondence will be done as per my new name, please consider the name.
Address :- BAJAR GALLI MUDKHED, NANDED, MAHARASHTRA 431806
Mobile No 9764696992

## Change In Name

My Old Name is **SHAIKH SHAHZAD ADIL** which now I am changing as New Name **SHAIKH SHAHZAD ADIL SHAIKH SALEEMUDDIN** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
Address - H.No. 801, Nomaniya Nagar, Near Sana High School, Taroda Bk. Nanded 431605 Mo.No. 7798494992

## Change In Name

My Old Name is **SATISH PANJASRAO DESHMUKH** which now I am changing as New Name **SATISH PANJABRAO DESHMUKH** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
Sign By : **SATISH PANJABRAO DESHMUKH**
Address - C/o. Swati Satish Deshmukh, Flat No. 304, Indujs Tower, Vrundavan Colony, Malegaon Road, Taroda, Nanded 431605 Mo.No. 9892442911

## बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन:



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ सलग्नित
**श्री साईबाबा संस्थान संचलित,**
**साईबाबा कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय**
साईनगर, धनगरवाडी, ता. जि. नांदेड.

### येथे पदवीसाठी प्रवेश देणे चालू आहे.

- **B.A** प्रथम आणि द्वितीय वर्ष
- **B.Com** प्रथम आणि द्वितीय वर्ष.
- **B.Sc** प्रथम आणि द्वितीय वर्ष (कॉम्प्युटर सायन्स)

– स्थळ –
साईबाबा महाविद्यालय, साईनगर, धनगरवाडी, ता. जि. नांदेड.
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडजवळ, हायवे रोडवर, श्री साईबाबा मंदिरजवळ, साईनगर, धनगरवाडी, ता. जि. नांदेड

संपर्क – मो. ७५८८६३२५५०, ९२२६७२९१४७, ९०९६००९२०५, ९५२७७५७२३६.

प्राचार्य, साईबाबा कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, साईनगर, धनगरवाडी, ता. जि. नांदेड

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.३५०

नाव परिवर्तन वार्ड क्र. १७मालमत्ता क्र. ६७० व ६७१ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, अन्सारी मोहम्मद नजीमोद्दीन मोहम्मद रहियोद्दीन रा. खुसरो नगर नांदेड नांदेड यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ६७० व ६७१ वार्ड न. १७ रिजवान उर रहेमान महेमुद उर रहेमान फारूखी यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ७५४/२०२६ दि. ०१/०६/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.
पूर्वेस – २० फुटाचा रस्ता, पश्चिमेस – महापुरकर रहेमान फारूखीची जागा, दक्षिणेस – अलीम इकबाल यांची प्लॉटींग, उत्तरेस – ३० फुटाचा रस्ता.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## जाहीर पत्रक
**नगर पंचायत, हिमायतनगर**
जा.क्र.३४९

नाव परिवर्तन वार्ड क्र. १५ मालमत्ता क्र. ८०९/अ या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस जाहीर केले जाते की, मनोहर संभाजी भुयारे रा. महादापुर हिमायतनगर यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, प्लॉट नं. ८०९/अ वार्ड न. १५ संदिप दत्तात्रय तुप्पेवार यांच्या नावाने असलेली जायदाद यांनी खरेदीपत्रक नं. ७५१/२०२६ दि. २९/०५/२०२६ च्या आधारे विक्री केली आहे किंवा वारसा हक्क प्राप्त झाला आहे. तरी त्याचे रजिस्टर रिव्हीजन नगर पंचायत नोंद घेण्यात येत आहे. तरी या संबंधि कोणास उजर असल्यास त्यांनी १५ दिवसांच्या आत आपला उजर योग्य पुराव्यासह लेखी दाखल करावा. नसता मुदत संपल्यावर अर्जदाराचे नाव रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात येईल.
पूर्वेस – प्लॉट नं. ४७, पश्चिमेस – प्लॉट नं. ४५, दक्षिणेस – ओंकार सुनिल मामीडवार यांचे शेत, उत्तरेस – ३० फुटाचा रस्ता.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत, हिमायतनगर**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

## पाहिजेत



श्री. साईबाबा संस्थान, साईनगर, धनगरवाडी, ता.जि.नांदेड संचलित
**साईबाबा कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय धनगरवाडी ता. जि. नांदेड**

साईबाबा (कला वाणिज्य व विज्ञान) महाविद्यालय, धनगरवाडी, ता.जि.नांदेड (कायम विनाअनुदानित) महाविद्यालयात शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्याच्या जागा इच्छुक उमेदवारांनी दि १४/०६/२०२६ रोजी रविवारी सकाळी ११:०० वाजता मुळ व छायांकीत प्रतिसह, साईबाबा महाविद्यालय, साईनगर, धनगरवाडी, ता.जि.नांदेड (saibabamvsd2025@gmail.com) येथे थेट मुलाखतीस उपस्थित राहावे.

| विषय | शैक्षणिक व व्यवसायीक पात्रता | संवर्ग |
|---|---|---|
| प्राचार्य | एम.ए./एम.एसी/एम.कॉम नेट/सेट/ पी एच.डी. (१५ वर्ष अध्यापनाचा अनूभव) | अराखीव. |
| अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास, भूगोल. | एम.ए., नेट/सेट/ पी एच.डी. पदसंख्या प्रत्यकी (०१) | U.G.C च्या नियमा प्रमाने लागू होईल. खुला, अनु जाती, अनु जमाती, वि.जा.अ., इ.मा.व., सा.शै.मा.प्र., विकलांग रिक्त पदा प्रमाने निवड करण्यात यईल. |
| मराठी इंग्रजी/ हिंदी. | एम.ए.नेट/सेट/पीएच.डी. पदसंख्या प्रत्यकी (०१) | |
| संगनकशास्त्र, सूक्ष्मजीवनशास्त्र प्राणीशास्त्र, वनस्पतिशास्त्र, गणित. | एम.एसी.एम.सी.ए.नेट/सेट/पी एच.डी. पदसंख्या प्रत्यकी (०१) | |
| वाणीज्य. | एम.कॉम. नेट/सेट/पीएच.डी. पदसंख्या प्रत्यकी (०१) | |
| प्रयोगशाळा सहाय्यक, लिपीक. शिपाई. | B-LIB/१२ वी (विज्ञान) १० वी. | पदसंख्या प्रत्यकी (०१) |

टिप:
१. विद्यापीठ अनुदान आयोग व महाराष्ट्र शासन यांनी ठरवून दिलेली शैक्षणिक पात्रता आवश्यक राहील.
२. मुलाखतीस येणाऱ्या उमेदवारांनी स्व:खर्चाने कोणतेही भाडे अथवा प्रवास भत्ता दिला जाणार नाही.

**संपर्क मो. ७५८८६३२५५०/९२२६७२९१४७.**

सचिव, श्री साईबाबा संस्थान, साईनगर, धनगरवाडी, ता. जि. नांदेड

ग्राम विकास शिक्षण संस्था चिखली संचलित,
**शांतीदूत गोविंदराव पाटील चिखलीकर कला व विज्ञान महाविद्यालय**
बारूळ ता. कंधार जि.नांदेड

## पाहिजेत

ग्राम विकास शिक्षण संस्था चिखली, ता. कंधार जि. नांदेड संचलित शांतीदूत गोविंदराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय बारूळ, ता. कंधार जि. नांदेड (कायम विनाअनुदानित) मा. सहसंचालक उच्च शिक्षण नांदेड यांचे पत्र क्र ८११ विशिससं/ उशि/ नांवि/ अनू-२/२०२४-२५ दि. १९/०५/२०२५ रोजीच्या ना हरकत प्रमाणपत्रानूसार पूर्णवेळ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या जागा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या नियमाप्रमाणे भरावयाच्या आहेत. इच्छुक उमेदवारांनी दि. १४/०६/२०२६ रविवार रोजी ठीक सकाळी ११ वाजता साईबाबा महाविद्यालय, साईनगर, धनगरवाडी, ता.जि.नांदेड येथे अर्ज व आवश्यक त्या कागदपत्राच्या मुळ व छायांकीत प्रतिसह थेट मुलाखतीस उपस्थित राहावे.

| पद | विषय | पद-संख्या | शैक्षणिक व व्यवसायीक पात्रता | संवर्ग |
|---|---|---|---|---|
| प्राचार्य | - | ०१ | एम.ए./एम.एसी, नेट/सेट/पीएच.डी. (१५ वर्ष अध्यापनाचा अनूभव) | अराखीव |
| सहा. प्राध्यापक | भूगोल | ०१ | एम.ए./एम.एसी, नेट/सेट/पीएच.डी. | खुला-०२ अनू-जाती-०१, वि.जा.(अ)-०१, इ.मा.व.-०१, सा.शै.मा.प्र-०१ |
| सहा. प्राध्यापक | शा.शि. संचालक | ०१ | एम.पी.एड. नेट/सेट/पीएच.डी | |
| सहा.प्राध्यापक | रसायनशास्त्र | ०१ | एम.ए./एम.एसी, नेट/सेट/पीएच.डी. | |
| सहा. प्राध्यापक | भौतिकशास्त्र | ०१ | एम.ए./एम.एसी नेट/सेट/पीएच.डी. | |
| सहा. प्राध्यापक | संगणकशास्त्र | ०१ | एम.एसी, एम.सी.ए.नेट/सेट/पीएच.डी. | |
| सहा. प्राध्यापक | ग्रंथपाल | ०१ | एम.लिब, नेट/सेट/पीएच.डी. | |
| मुख्य लिपीक | – | ०१ | पदवीधर – टाईप, संगणक | अराखीव |
| वरिष्ठ लिपीक | – | ०१ | पदवीधर – टाईप, संगणक | अराखीव |
| कनिष्ठ लिपीक | – | ०१ | पदवीधर – टाईप, संगणक | अराखीव |
| प्रयोगशाळा सहाय्यक | – | ०१ | १२ वी (विज्ञान) उत्तीर्ण | अराखीव |
| ग्रंथालय परिचर | – | ०१ | १० वी उत्तीर्ण | खुला-०३ अनु.जाती-०१, अनु. जमाती-०१, वि.जा.अ.-०१,इ.मा.व.-०१, सा.शै.मा.प्र-०१,आ.दु.घ.०१ |
| प्रयोगशाळा परिचर | – | ०४ | १० वी उत्तीर्ण | |
| शिपाई | – | ०४ | १० वी उत्तीर्ण | |

टिप : १. विद्यापीठ अनुदान आयोग व महाराष्ट्र शासन यांनी ठरवून दिलेली शैक्षणिक पात्रता आवश्यक राहील.
२. मुलाखतीस येणाऱ्या उमेदवारांनी स्व:खर्चाने कोणतेही भाडे अथवा प्रवास भत्ता दिला जाणार नाही.

**संपर्क – मो. ९५५२७२२७२१**

ग्राम विकास शिक्षण सचिव, संस्था चिखली, ता. कंधार जि. नांदेड

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



# खैरका येथे स्टेफनी चोरल्यावरून खूनप्रकरणी दोन आरोपी गजाआड



**नांदेड (प्रतिनिधी)** – मुखेड तालुक्यातील खैरका येथील एका ४२ वर्षीय व्यक्तीला स्टेफनी चोरल्याच्या कारणावरून जबर मारहाण केली. या मारहाणीत एकाला जीव गमवावा लागला. ही धक्कादायक घटना बुधवार, दि. १० जून रोजी सकाळी साडेदहाच्या सुमारास घडली. ज्ञानोबा नारायण घुरके (४२) रा. खैरका असे मयत युवकाचे नाव आहे. या प्रकरणी दोघांना गजाआड करण्यात आले आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीवरून ज्ञानोबा श्रीरामे हे बुधवारी सकाळी १०.३० वाजता ज्वारी विकण्यासाठी मुखेड येथील मोंढ्यात आले होते. ते आडत दुकानावर असताना त्यांच्याच गावातील गजानन माणिकराव सदागीर आणि अप्पाराव बालाजी सूर्यवंशी यांनी त्यांना गाठले. मोंढ्यातच काही वेळ वाद झाल्यानंतर या दोघांनी वाहन क्रमांक (एमएच २४- एबी-७४ ३५) वर बसवून शहराच्या बाहेर घेऊन गेले. जबर मारहाण करून अपघात झाल्याचे दाखवत या मारेकऱ्यानेच मयत ज्ञानोबा घुरके याला मुखेड रुग्णालयात नेऊन टाकले आणि तेथून ते पसार झाले. मुखेड येथील उपजिल्हा रुग्णालयातील कर्तव्यावर असलेले डॉ. उमाकांत गायकवाड यांनी ज्ञानेश्वर श्रीरामे यांना तपासून मृत घोषित केले.

या घटनेची माहिती मिळताच मुखेडचे पोलीस निरीक्षक चितांबर कामठेवाड व त्यांच्या सहकाऱ्यांनी रुग्णालयात धाव घेतली. मृतदेहाचा पंचनामा केला. शशिकला यादव देवकते (वय ४०) यांच्या फिर्यादीवरून मुखेड पोलीस ठाण्यात वरील दोघांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी तत्काळ दोन्ही आरोपींना अटक केली आहे.

## तोतया पोलिसाने वृद्ध महिलेस लुटले


**नांदेड (प्रतिनिधी)**– पोलीस अधिकारी असल्याचा बनाव करून एका वृद्ध महिलेचे सोन्याचे दागिने घेऊन फसवून करणाऱ्या कृपया पोलिसांविरुद्ध हदगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मंगळवार, दि. १० जून रोजी सकाळी अंदाजे साडेअकराच्या सुमारास पाथरड फाटा येथे तीन अनोळखीने मारोतराव नामदेवराव तवर (वय ७५, रा. पिंपरी बु., ता. कळमनुरी) व त्यांच्या पत्नीकडे जाऊन तुमच्या परिसरात चोरी झाली आहे, तुमच्याकडील सोने आमच्याकडे सुरक्षिततेसाठी द्या, अशी बतावणी केली. या आरोपींनी स्वतःला पोलीस असल्याचे सांगून सुमारे ६५ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने घेऊन तेथून पसार झाले. या प्रकरणी मारोतराव तवर यांनी फिर्याद दिल्यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# डिझेलचा टँकर पुढच्या टँकरवर धडकून चालक ठार

**नांदेड (प्रतिनिधी)** –भरधाव वेगातील टँकर चालकाचे नियंत्रण सुटून समोर चाललेल्या टँकरला पाठीमागून जोराची धडक दिल्याने चालकाचा जागीच मृत्यू झाला. ही घटना डेरला पाटीजवळ गुरुवार, दि. ११ जून रोजी सकाळी अकराच्या सुमारास घडली. विशेष म्हणजे अपघातग्रस्त दोन्हीही टँकर एकाच मालकाचे असल्याचे सांगण्यात आले.

संदीपसिंग रमज्यासिंग (वय ३८ रा. बालिया उत्तर प्रदेश) हा दि. ११ जून रोजी टँकर क्रमांक (केए २० एसी ९८० ९) घेऊन व त्याचा सहकारी मित्र टँकर क्रमांक (केए२०-एसी- ९८० ८) नांदेडच्या दिशेने दोघे निघाले होते. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ ते डेरला पाटी रस्त्यावर दुपारी ११ च्या सुमारास पाठीमागून येणार (केए २०- एसी- ९८० ९) संदीपसिंग या चालकाचे नियंत्रण सुटल्याने हा टँकर समोर असलेल्या टँकरवर पाठीमागून जोरात आदळला. यात टँकरचा



समोरील भाग चेंदामेंदा होऊन चालक संदीपसिंग याचा जागीच मृत्यू झाला. ही माहिती नांदेड ग्रामीण पोलिसांना समजताच पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. तोपर्यंत रस्त्यावर वाहतुकीचा मोठा खोळंबा उडाला होता.

सर्वात अगोदर पोलिसांनी कॅबिनमध्ये गंभीर जखमी अवस्थेत अडकलेल्या अपघातग्रस्त चालकास बाहेर काढून शासकीय रुग्णालय विष्णुपुरी येथे दाखल केले. मात्र रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे रुग्णालय सूत्राने जाहीर केले. त्यानंतर खोळंबलेली वाहतूक सुरळीत केली. यावेळी घटनास्थळावर बघ्यांनीही प्रचंड गर्दी केली होती.

# विशेष तिकीट तपासणी मोहिमेत ५.८६ लाख दंड वसूल



**नांदेड (प्रतिनिधी)**– प्रवाशांना सुरक्षित, सुलभ व नियमबद्ध प्रवासाचा अनुभव देण्याच्या तसेच विनातिकीट व अनियमित प्रवासाला आळा घालण्याच्या उद्देशाने दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागात दि. ९ जून रोजी विभागातील विविध रेल्वे स्थानके व गाड्यांमध्ये व्यापक विशेष तिकीट तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेचा मुख्य उद्देश महसूल गळती रोखणे, प्रवास नियमांचे पालन सुनिश्चित करणे आणि वैध तिकीटधारक प्रवाशांना अधिक सुरक्षित व आरामदायी प्रवास सुविधा उपलब्ध करून देणे हा होता.

या विशेष मोहिमेदरम्यान तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांनी गाड्या, रेल्वे स्थानके तसेच महत्त्वाच्या प्रवासी क्षेत्रांमध्ये व्यापक तपासणी केली. या संयुक्त प्रयत्नांतून विनातिकीट प्रवास करणाऱ्या ८०४ प्रवाशांविरुद्ध कारवाई करण्यात आली असून त्यातून ४ लाख ४७ हजार १० रुपये इतका महसूल प्राप्त झाला. याशिवाय अनियमित प्रवास करणाऱ्या २४५ प्रवाशांची प्रकरणे नोंदविण्यात आली असून त्यातून १ लाख २२ हजार ५५० रुपये महसूल वसूल करण्यात आला. तसेच बुक न केलेल्या सामानाच्या १०६ प्रकरणांमधून १६ हजार ८९५ रुपये इतकी रक्कम वसूल करण्यात आली.

अशाप्रकारे या विशेष मोहिमेत एकूण १,१५५ प्रकरणे आढळून आली असून रेल्वेला ५ लाख ८६ हजार ४५५ इतका महसूल प्राप्त झाला.

विभागभर प्रभावी तपासणी सुनिश्चित करण्यासाठी एकूण १५४ तिकीट तपासणी कर्मचारी तैनात करण्यात आले होते. यामध्ये तिकीट तपासणी पथकांमध्ये २९ कर्मचारी, स्थानकांवरील स्थिर तपासणीसाठी १२ कर्मचारी आणि सुविधा तसेच स्लीपर श्रेणी तपासणीसाठी ११३ कर्मचाऱ्यांचा समावेश होता. या पथकांनी आरक्षित व अनारक्षित डबे, स्थानक परिसर तसेच सामान वाहतूक क्षेत्रांमध्ये सखोल तपासणी करून रेल्वे नियमांचे काटेकोर पालन सुनिश्चित केले. अशा मोहिमांमुळे आरक्षित डब्यांमधील अनावश्यक गर्दी कमी होण्यास मदत होते. तसेच वैध तिकीटधारक प्रवाशांचा प्रवास अधिक सुव्यवस्थित व आरामदायी होतो.

# किरकोळ कारणावरून प्लंबरचा खून करणाऱ्या दोघांना अटक

**◆ पिरबुऱ्हाननगर घटनेच्या निषेधार्थ कडकडीत बंद, ◆ स्थागुशा आणि सोनखेड पोलिसांची तत्परता कामी**

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहरापासून १५ किलोमीटर अंतरावर असलेल्या लोहा रस्त्यावरील एका पेट्रोल पंपावर किरकोळ कारणावरून तेथे काम करणाऱ्या प्लंबरचा खून करण्यात आला होता. या प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखा आणि सोनखेड पोलिसांनी संयुक्त कारवाई करत फरार होण्याच्या तयारीत असलेल्या दोन फरार आरोपींसह इतर दोन सहकार्य करणाऱ्या अशा चार आरोपींना अटक केली आहे.

या घटनेच्या निषेधार्थ पीरबुऱ्हाननगर कडकडीत बंद ठेवण्यात आले होते. लोहा तालुक्यातील सोनखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत सोनखेड ते नांदेड रस्त्यावर सुमित पेट्रोल पंपावर प्लंबरचे काम नांदेड शहराच्या पिरबुऱ्हाननगर भागातील किफायत अली खाजा मोहिनुद्दीन हा काम करत होता. यावेळी सोनखेडमधील गणपती मंदिराजवळ राहणारे



पवन राजेभाऊ चौधरी वय २३, बालाजी शिवाजीराव मोरे वय ३६, हे दोघेजण एका दुचाकीवरून पेट्रोल भरण्यासाठी बुधवार, दि. १० जून रोजी दुपारी चारच्या सुमारास तिथे आले. प्लंबरचे काम करणाऱ्या किफायत अली खाजा याला पेट्रोल आहे का असे विचारले. यावेळी मला माहिती नाही, मी प्लंबर काम करतोय, समोर जाऊन विचारा असे म्हणताच दुचाकीवरून आलेल्या पवन चौधरी आणि बालाजी मोरे यांनी संगनमत करून किफायत अली खाजा याला जबर मारहाण केली. ही मारहाण तेथील सीसीटीव्ही फुटेजमध्ये कैद झाली.

गंभीर जखमी अवस्थेत किफायत अली पडल्यानंतर हे दोघेही घटनास्थळावरून पसार झाले. तेथील काही कर्मचाऱ्यांनी तत्काळ जखमीला नांदेडच्या विष्णुपुरी शासकीय रुग्णालयात दाखल केले, मात्र उपचार सुरू होण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला असे रुग्णालय सूत्राने सांगितले. माहिती मिळताच वरिष्ठांच्या आदेशावरून सोनखेडचे सहायक पोलीस निरीक्षक भागवत नागरगोजे व त्यांची टीम तर नांदेड शहरातून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले हे आपल्या अन्य सहकाऱ्यांसोबत घटनास्थळाकडे रवाना झाले.

स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक विठ्ठल घोगरे, पोलीस उपनिरीक्षक नागनाथ तुकडे, महेश कोरे, साईनाथ पुयड यासोबतच नांदेड ग्रामीणचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांचेही पथक शहराच्या विविध भागात पोहोचले. दोन्ही आरोपी मध्यवर्ती बसस्थानक नांदेड येथे आल्याची माहिती एका पथकाला समजताच त्यांनी तेथे सापळा रचून फरार होण्याच्या तयारीत असलेल्या दोन्ही आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या एपीआय विठ्ठल घोगरे यांच्या पथकाने अटक केली. यासह त्यांना मदत करणाऱ्या भूषण सुभाषराव देशमुख, वय २५, रा. सोनखडे, व कृष्णा तुकाराम नरवाडे, अशा चार जणांना अटक करण्यात आली आहे.

आरोपींनी खून केल्याची पोलिसांसमोर कबुली दिली आहे. सहायक पोलीस निरीक्षक नागरगोजे यांनी आपले सहकारी पोलीस उपनिरीक्षक वैशाली कांबळे यांच्यासमवेत दोन्ही आरोपींना न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडीत पाठवले आहे. अवघ्या आठ तासांत दोन्ही आरोपींच्या मुसक्या आवळल्या आहेत.

## अपहारप्रकरणी वाजेगावच्या सरपंचाचा तुरुंगातील मुक्काम वाढला

**नांदेड (प्रतिनिधी)** –तालुक्यातील वाजेगाव सरपंचाची जमानत पुन्हा नाकारण्यात आली असून, सरपंचाचा तुरुंगामधील मुक्काम वाढला आहे.

वाजेगाव ग्रामपंचायतीत दलित वस्ती निधीत फेरफार करणे, बोगस कामे दाखवणे आणि चक्क मृत व्यक्तीच्या नावे अनुदान लाटण्यासारखे गंभीर प्रकार समोर आले आहेत. या प्रकरणी सरपंच शेख जमील अहमद अमीर हमजा यांना नांदेड ग्रामीण पोलिसांनी अटक केली असून, दोन ग्रामसेवकांसह इतरांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी सरपंचास अटक





करण्यात आली आहे. जमानत मिळावी यासाठी न्यायालयात अर्ज दाखल करण्यात आला होता. या प्रकरणी न्यायालयाने निर्णय देऊन जमानत नाकारली आहे. फिर्यादीचे वकील ॲड. शिवराज पाटील व ॲड. नयूम पठाण यांनी युक्तिवाद केला.

## मातोश्री शासकीय मुलांचे वसतिगृहात १५ ते ३० जूनदरम्यान प्रवेश सुरु

**नांदेड (प्रतिनिधी)** –मातोश्री शासकीय ई.बी.सी. मुलांचे वसतिगृह, तथागत नगर, मालेगाव रोड, नांदेड या वसतिगृहात शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी नांदेड शहर परिसरातील माध्यमिक, उच्च माध्यमिक व पदवीसाठी शिक्षण घेत असलेल्या आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शासनाच्या धोरणानुसार निवासाची व भोजनाची विनामूल्य सोय करण्यात येत आहे.

प्रस्तुत वसतिगृहात शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ करिता पुनर्प्रवेश/नूतन प्रवेशाबाबत याव्दारे अर्ज मागविण्यात येत आहेत. पुनर्प्रवेश/नूतन प्रवेशाचे अर्ज वसतिगृहात कार्यालयीन वेळेत १५ ते ३० जून, २०२६ या कालावधीत (शासकीय सुट्ट्यांचे दिवस वगळून) उपलब्ध करण्यात आलेले आहेत. सदर कालावधीत परिपूर्ण पुनर्प्रवेश/नूतन प्रवेशाचे अर्ज हे संबंधित विहित कागदपत्रांसह स्वीकारण्यात येईल. वरील निश्चित केलेल्या कालावधीनंतर आलेल्या अर्जाचा स्वीकार केला जाणार नाही याची विद्यार्थी व पालकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन गृहप्रमुख मातोश्री शासकीय इबीसी मुलांचे वसतिगृह नांदेड यांनी केले आहे.

**पान १ वरून...**

**किरकोळ वादातून तरूणाचा...**

वेगाने पसार झाला.

विमानतळ पोलिसांना माहिती मिळताच घटनास्थळी दाखल झाले. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या गौतमला अत्यंत गंभीर अवस्थेत तातडीने उपचारासाठी विष्णुपुरी येथील सरकारी रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले. मात्र, येथील डॉक्टरांनी त्याला तपासून उपचारापूर्वीच मृत घोषित केले. पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. गुन्हा घडल्यानंतर अवघ्या काही वेळातच आरोपी सत्यम जाधव याला त्याच्या राहत्या घरातूनच शिताफीने अटक केली आहे.

# देगलूरमध्ये जीवघेणा हल्ला करणाऱ्या आरोपीस अटक

**नांदेड (प्रतिनिधी)** –देगलूर शहरातील कापड बाजारातील हनुमान मंदिर चौक परिसरात बुधवार दि. १० जून रोजी मध्यरात्री झालेल्या जीवघेणा हल्ल्याप्रकरणी देगलूर पोलिसांनी तत्पर कारवाई करत आरोपीला अवघ्या काही तासांत अटक केली. दगडाने डोक्यावर आणि चेहऱ्यावर मारुन एका तरुणाचा खून करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याची घटना समोर आली आहे.

देगलूरच्या भोई गल्ली भागात राहणाऱ्या सावित्रा माधव वडेटवार (वय ३५) यांनी देगलूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. जखमी शंकर हुसेन्ना आमृतवार (वय २९, मूळ रा. सुलतानपेठ, ता. मदनूर, जि. कामारेड्डी, सध्या रा. देगलूर) हा त्यांचा सख्खा भाऊ असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. दि. १० जून रोजी रात्री सुमारे ११ ते १२ वाजण्याच्या दरम्यान प्रकाश गज्जलवार (रा. सांगवी (क), ता. देगलूर) याचा शंकर आमृतवार याच्याशी किरकोळ कारणावरून वाद झाला. वादाचे रूपांतर हाणामारीत झाल्यानंतर संतप्त झालेल्या प्रकाश गज्जलवार याने दगडाने शंकरच्या डोक्यावर व चेहऱ्यावर वार करत गंभीर जखमी केले. हल्ल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाला. दरम्यान, गस्तीवर असलेल्या देगलूर पोलिसांच्या पथकाला हनुमान चौक परिसरात एक व्यक्ती रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे दिसून आले. पोलिसांनी तातडीने जखमी शंकर आमृतवार याला देगलूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. प्राथमिक उपचारानंतर त्याला पुढील उपचारासाठी नांदेड येथील शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले. घटनेचा तपास करताना पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली. त्यामध्ये प्रकाश गज्जलवार हा शंकर अमृतवार याच्यावर दगडाने हल्ला करत असल्याचे स्पष्टपणे दिसून आले. या आधारे आरोपीची ओळख पटवून पोलिसांनी तातडीने शोधमोहीम हाती घेतली आणि काही तासांतच त्याला अटक करण्यात यश मिळविले. प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक गोपाळ सूर्यवंशी करत आहेत.

## इयत्ता ५ वी ते ८ वीच्या विद्यार्थ्यांचा मूल्यमापन निकाल संकेतस्थळावर जाहीर

**नांदेड (प्रतिनिधी)** –महाराष्ट्र मुक्त विद्यालय मंडळ, पुणेमार्फत महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या विभागीय मंडळामार्फत इयत्ता ५ वी प्राथमिक स्तर व इयत्ता ८ वी उच्च प्राथमिक स्तराच्या मूल्यमापनासाठी प्रविष्ठ विद्यार्थ्यांसाठी १५ एप्रिल ते २५ एप्रिल २०२६ या कालावधीत मूल्यमापन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या मूल्यमापनाचा निकाल www.msbos.mh-ssc.ac.in या संकेतस्थळावर ११ जून २०२६ रोजी जाहिर करण्यात आला आहे.

या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांची विषयनिहाय श्रेणी दर्शविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना सदर माहितीची प्रिंट घेता येईल. पात्र विद्यार्थ्यांना त्यांचे इयत्ता ५ वी ते ८ वी ची अर्हता व विद्याविषयक कौशल्य प्राप्त केल्याचे प्रमाणपत्र यथावकाश वितरीत करण्यात येईल, असे आवाहन लातूर विभागीय मंडळाचे सचिव यांनी केले आहे.

# धनेगाव मुझामपेठ ग्रा.पं. वार्डनिहाय आरक्षण घोषित



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– आगामी ग्रामपंचायत निवडणुकीसाठी नांदेड तहसीलदार यांच्या मार्गदर्शनाखाली धनेगाव-मुझामपेठ ग्रामपंचायत कार्यालय येथे आरक्षण सोडत काढण्यात आली. ११ जून रोजी निवडणूक अधिकारी तथा मंडळ अधिकारी सय्यद मोहसीन अहेमद एकबाल यांच्या उपस्थितीत वार्ड सहा व सतरा जागेसाठी वार्डनिहाय आरक्षण जाहीर करण्यात आले.

यावेळी महिलांसाठी ९ तर अनुसूचित जाती ५, ओबीसीसाठी ३ जागा सोडण्यात आल्या आहेत. यावेळी नितीन शिंदे व साईनाथ शिंदे यांनी ग्रामसभा संदर्भात माहिती दिली नसल्याचे सांगून या आरक्षण संदर्भात हरकत घेणार असल्याचे सांगण्यात आले.

नांदेड जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अधिपत्याखाली उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांच्या आदेशानुसार तहसीलदार संजय वारकड यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी सय्यद मोहसीन अहेमद एकबाल, तलाठी दीपक सोनटक्के, ग्रामसेवक व्ही. पी. सूयवंशी, ग्रामपंचायत कर्मचारी शेख मुख्तार, सतीश देशमुख, बळीराम भालके यांच्यासह माजी ग्रामपंचायत सदस्य तातेराव ढवळे, मोहंमद रफीक अहेमद, शेख फारूख, शैलेंद्रसिंह ठाकूर, माजी तंटामुक्त अध्यक्ष रमेश वाघमारे, अर्जून रायभोळे, संदीप गजभारे, कमलाकर देशमुख, माधव देशमुख, शंकर शिंदे, माधव भीमराव देशमुख, पोलीस पाटील महानंदा यलगंदवार यांच्यासह गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

२०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या १२२९७ असून धनेगाव-मुझामपेठ ग्रामपंचायत निवडणुकीसाठी ग्रामपंचायत कार्यालय येथे वार्ड सहा आहेत. १७ जागेसाठी वार्डनिहाय आरक्षण घोषित करण्यात आले. यावेळी अनुसूचित जाती ५, नागरिक मागासवर्ग प्रवर्गासाठी ३, महिलांसाठी ९ जागा महिला आरक्षण सोडतीप्रमाणे चिठ्ठी टाकून सोडण्यात आले. आरक्षण सोडत संदर्भात घेण्यात आलेल्या ग्रामसभेसाठी कोणतीही सुचना देण्यात आली नसल्याची तक्रार ग्रामपंचायत सदस्य नितीन शिंदे, साईनाथ शिंदे यांच्यासह अनेकांनी केली आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com